**बिसेन डेन्टल केअर**
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com
# बेरार टाईम्स
मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे





गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१४ गोंदिया | अंक ३४ | बुधवार,दि.३० जुलै २०२५ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/104/2025-2027


# एसटी कल्याण समितीच्या सेवेसाठी अधिकारी लागले कामाला,समितीचा आढावा सुरु

**गोंदिया :-** राज्य शासनाची अनुसूचित जमाती कल्याण समिती (ता. २९) पासून तीन दिवस जिल्ह्याच्या दौऱ्यावर आली आहे. समितीचे १६ पैकी ८ सदस्य आमदार जिल्ह्यात दाखल झाले आहेत. दौऱ्याचा पहिला दिवस असून समितीकडून जिल्हा परिषदेच्या सभागृहात सर्व विभागाचा आदिवासी कल्याण संदर्भात राबविण्यात येणाऱ्या योजना व माहितीचा आढावा घेण्यात आला आहे. ३० जुलैपासून शासकीय संस्थांना भेटी देवून व्यवस्थेची पाहणी करण्यात येणार आहे. त्याचबरोबर समितीच्या सदस्यांत वाढ होणार, असेही मानले जात आहे. विशेष म्हणजे शिवसेना नेते आदित्य ठाकरे हे या समितीचे सदस्य असून ते सुध्दा या मागास आदिवासी जिल्ह्यातील समस्यांची जाणीव करुन घेण्याकरीता पोचलेले नाहीत.तर समिती प्रमुख आ.दरोडानी लोकप्रतिनिधी व संस्थाच्या प्रतिनिधींशी भेट घेत निवेदन स्विकारत समस्या ऐकून घेतल्या. विशेष म्हणजे या समितीच्या सेवेसाठी अनेक विभागाचे अधिकारी कामाला लागले असून अर्जुनी मोरगाव, सालेकसा, आमगाव देवरी या भागातील कामांमधील अनियमितता झाकण्यासाठी प्रयत्न सुरु झाले आहेत. ही समिती आश्रम शाळामधील अव्यवस्था व रिक्त पदांची सोडवणूक कशा पद्धतीने करते हे सुद्धा बघावे लागणार आहे.

जिल्ह्याच्या दौऱ्यावर आलेली अनुसूचित जमाती कल्याण समिती आजपासून तीन दिवस मुक्कामी राहणार आहे. समितीचे



प्रमुख आ. दौलत दरोडा यांच्या नेतृत्वात आलेल्या समितीचे जिल्हा प्रशासनाकडून स्वागत करण्यात आले. दरम्यान विश्रामगृहात विविध पक्ष, संघटना, कार्यकर्त्यांनी सामाजिक समितीच्या सदस्यांची भेट घेवून समस्या व मागण्यांचे निवेदन सादर केले. यानंतर नियोजित दौऱ्याच्या समिती कार्यक्रमानुसार जिल्हाधिकारी कार्यालयात पोहोचली. जिल्हा प्रशासनाकडून समितीचे स्वागत करण्यात आले. यानंतर जिल्हा परिषदेच्त्या सभागृहात समितीकडून सर्व विभागाचा आढावा घेण्यात आला. आज, दिवसभर घेतलेल्या आढावानंतर ३० जुलै रोजी समिती जिल्ह्यातील काही संस्थांना भेट देवून पाहणी करणार आहे. तीन दिवस मुक्कामी राहणाऱ्या समितीच्या सदस्यांच्या सेवेसाठी शासकीय यंत्रणा कामाला लागली आहे. या समितीमध्ये एकूण १६ सदस्य आमदार असून पहिल्या दिवशी ८ सदस्य गोंदियात पोहोचले.आणखी काही सदस्य या दौऱ्यात सहभागी होणार असल्याची माहिती आहे.

३१ जुलै रोजी सकाळी १० ते ११ पर्यंत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक गोंदिया येथे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक कार्यालयातील अनुसूचित जमातीच्या प्रवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांच्या भरती, आरक्षण अनुशेष व जात पडताळणी विषयक बाबी संदर्भात संबंधित अधिकाऱ्यांसमवेत चर्चा.

सकाळी ११ ते दुपारी ३ पर्यंत जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया येथे समितीने जिल्ह्यातील आदिवासी आश्रमशाळा/वसतिगृह तसेच शासनाच्या व जिल्हा परिषद यंत्रणांकडून आदिवासी उपयोजना क्षेत्रात राबविण्यात आलेल्या योजनांबाबत कामांना दिलेल्या भेटीच्या अनुषंगाने आढळून आलेल्या त्रुटीसंदर्भात करावयाची कार्यवाही तसेच जिल्हाधिकारी कार्यालय, नगरपरिषद, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी व पोलीस अधीक्षक या कार्यालयातील अनुसूचित जमातीच्या प्रवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांच्या भरती, आरक्षण व अनुशेष याबाबत झालेल्या बैठकीच्यावेळी उपस्थित झालेल्या मुद्यांच्या अनुषंगाने करावयाची कार्यवाही यासंदर्भात तसेच जिल्ह्यातील सर्व तहसिलदार व सर्व संबंधित अधिकाऱ्यांसमवेत आढावा बैठक व चर्चा.



**लाखो रूपये खर्चून जिल्हा परिषदेच्या वसंतराव नाईक सभागृहाची दुरुस्ती करण्यात आली. फर्निचरसह इतर बाबीवर लाखो रुपये खर्च करण्यात आले. मात्र विधान मंडळाची अनुसूचित जमाती समिती जिल्ह्यात असताना व जिल्हा परिषदेचा आढावा याच सभागृहात असताना छत गळू नये म्हणून ताडपत्री टाकून पर्यायी व्यवस्था केल्याचे दिसून आले.**

# मंत्र्यांची वादग्रस्त विधाने अजिबात खपवून घेणार नाही



**मुंबई :-** राज्य सरकारमधील काही मंत्र्यांच्या वादग्रस्त विधानांमुळे आणि कृतीमुळे सरकारची प्रतिमा मलीन होत असल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रिमंडळाच्या बैठकीत थेट, स्पष्ट आणि कठोर शब्दांत इशारा दिला. "शपथ घेऊनही तुम्हाला लाज कशी वाटत नाही?" असा संतप्त सवाल करत त्यांनी वादग्रस्त वागणुकीवर अखेरचा इशारा दिला, "ही तुमची शेवटची संधी आहे, अन्यथा कारवाई होणारच!"

आज मंत्रालयात पार पडलेल्या मंत्रिमंडळाच्या साप्ताहिक बैठकीत हा विषय ऐरणीवर आला. ही बैठक विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनानंतरची पहिलीच होती. बैठकीतील अजेंडा पूर्ण झाल्यानंतर मुख्य सचिव आणि इतर अधिकारी बाहेर पाठवून मंत्र्यांच्या वादग्रस्त वर्तनावर चर्चा सुरू झाली.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी सर्वप्रथम नाखुशी व्यक्त करत मंत्रीमंडळातील काही सदस्यांच्या वागणुकीमुळे सरकारची प्रतिमा धोक्यात येत असल्याचे सांगितले. त्यांनी आवाहन केले की, सार्वजनिक ठिकाणी मंत्री बोलताना जबाबदारीने वागले पाहिजे. त्यानंतर फडणवीस यांनी वादग्रस्त मंत्र्यांना थेट सुनावले.ङ्कसरकार उत्तम काम करत असताना काही मंत्र्यांच्या बेजबाबदार विधानांमुळे विरोधकांच्या हातात आयते कोलीत मिळते. सरकारला अडचणीत आणणाऱ्या वागणुकीवर आता सहनशक्ती संपली आहे.

सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, कृषिमंत्री माणिकराव कोकाटे, आणि गृह राज्यमंत्री योगेश कदम हे वादग्रस्त विधानांमुळे चर्चेत आले होते. विशेषतः कोकाटे यांचा विधानसभेच्या अधिवेशनात मोबाईलवर रमी खेळतानाचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर प्रचंड टीका झाली होती.

या संदर्भात अजित पवार यांनी कोकाटे यांना त्यांच्या दालनात बोलावून घेतले. चर्चेत कोकाटे यांनी चूक मान्य करत भविष्यात अशी गोष्ट पुन्हा होणार नाही अशी हमी दिली. त्यावर पवार म्हणाले, पुन्हा चूक झाली तर कुठलीही ढाल मिळणार नाही.

मुख्यमंत्री फडणवीसांनीही मंत्र्यांना जाणीव करून दिली की, पुढे जर अशीच वागणूक सुरू राहिली, तर कठोर निर्णय घ्यावा लागेल. सगळ्यांनी शपथ घेतली आहे. तरीही लाज वाटत नाही, हे दुर्दैवी आहे,ङ्क असा रोष त्यांनी व्यक्त केला. या स्पष्ट आणि थेट इशाऱ्यांमुळे मंत्रिमंडळात अनेक मंत्र्यांची स्थिती गोंधळलेली आणि अस्वस्थ झाली होती. पुढे काय कारवाई होते, हे येणाऱ्या काळात स्पष्ट होईल, पण आजचा इशारा मंत्रिमंडळासाठी मलाल सिग्नलफ ठरला आहे.

# राज्यात "मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान' राबविणार

**मुंबई :-** राज्यात ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषदांसाठी सन २०२५-२६ या आर्थिक वर्षापासून तालुका, जिल्हा, महसूल विभाग व राज्य अशा चार स्तरांवर "मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान' हे पुरस्कार अभियान राबविण्यास झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. तसेच या अभियानातील पुरस्कारांकरिता दरवर्षी २९० कोटी ३३ लाख रुपयांची तरतूद करण्यास मान्यता देण्यात आली.

या अभियानात १ हजार ९०२ पुरस्कार दिले जाणार असून अभियानाचा कालावधी १७ सप्टेंबर, ते ३१ डिसेंबर, २०२५ असा राहणार आहे. ग्रामपंचायतीसाठी राज्यस्तरावर प्रथम क्रमांकासाठी ५ कोटी रुपये, द्वितीय क्रमांकासाठी ३ कोटी रुपये आणि तृतीय क्रमांकासाठी २ कोटी रुपयांचा पुरस्कार देण्यात येणार आहे. तर विभागस्तरीय पुरस्कारात विभागनिहाय पहिल्या ३ ग्रामपंचायती अशा एकूण १८ ग्रामपंचायतींना अनुक्रमे १ कोटी, ८० लाख आणि ६० लाख रुपयांचा पुरस्कार देण्यात येणार आहे. जिल्हास्तरासाठी ३४ जिल्ह्यातील एकूण १०२ ग्रामपंचायतींना अनुक्रमे प्रथम क्रमांकासाठी ५० लाख, द्वितीयसाठी



३० लाख आणि तृतीयसाठी २० लाख रुपयांचा पुरस्कार देण्यात येणार आहे. तालुकास्तरावर (१०५३ पुरस्कार) ग्रामपंचायतीला प्रथम क्रमांकासाठी १५ लाख, द्वितीय क्रमांकासाठी १२ लाख, तृतीय क्रमांकासाठी ८ लाख रुपये अशा एकूण १ हजार ५३ ग्रामपंचायती आणि ५ लाख रुपयांचे दोन विशेष पुरस्कार (७०२ पुरस्कार) देण्यात येणार आहेत.

पंचायत समितीसाठी राज्यस्तरावर प्रथम क्रमांकासाठी २ कोटी रुपये, द्वितीय क्रमांकासाठी दीड कोटी रुपये आणि तृतीय क्रमांकासाठी १ कोटी २५ लाख रुपयांचा पुरस्कार देण्यात येणार आहे. तर विभागस्तरावर (१८ पुरस्कार) प्रथम क्रमांकासाठी १ कोटी रुपये, द्वितीय क्रमांकासाठी ७५ लाख रुपये आणि तृतीय क्रमांकासाठी ६० लाख रुपयांचा पुरस्कार देण्यात येणार आहे.

जिल्हा परिषदेसाठी राज्यस्तरावर प्रथम क्रमांकासाठी ५ कोटी रुपये, द्वितीय क्रमांकासाठी ३ कोटी रुपये आणि तृतीय क्रमांकासाठी २ कोटी रुपयांचा पुरस्कार देण्यात येणार आहे.

या अभियानाच्या अंमलबजावणी व संनियंत्रणासाठी राज्यस्तरावर ग्रामविकास व पंचायतराज मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली १६ सदस्यांची समिती स्थापन करण्यात येणार आहे. या अभियानाची पूर्वतयारी १ ऑगस्टपासून सुरु होणार आहे. या अभियान पुरस्कारासाठी निवड करण्याकरिता तालुका, जिल्हा व राज्यस्तरावर मूल्यमापनासाठी समित्या स्थापन करण्यात येतील. तसेच अभियानाची प्रभावी अंमलबजावणी व्हावी, यासाठी विभाग, जिल्हा व पंचायत समिती स्तरावर संनियंत्रण व मूल्यमापन यंत्रणा समिती काम करणार आहे. या अभियांनाच्या प्रत्येक टप्प्यावरील मूल्यमापनासाठी कार्यपध्दती व वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे.

या अभियानात सात मुख्य घटक आहेत. यात सुशासनयुक्त पंचायत, सक्षम पंचायत, जल समृद्ध, स्वच्छ व हरित गाव, मनरेगा व इतर योजनांची सांगड, गावपातळीवरील संस्थांचे सक्षमीकरण, उपजीविका विकास व सामाजिक न्याय, लोकसहभाग व श्रमदान माध्यमातून लोकचळवळ अशा घटकांचा समावेश आहे. या घटकांच्या आधारे गुणांकन करुन पुरस्कारासाठी निवड केली जाणार आहे.

# शासकीय कर्मचाऱ्यांच्या सोशल मीडिया वापराबाबत मार्गदर्शक सूचना

**मुंबई:** - राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी सोशल मीडियाचा वापर करण्याबाबत नवे मार्गदर्शक नियम जाहीर केले असून त्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. डिजिटल युगात सोशल मीडिया हे संवादाचे प्रभावी साधन असले तरी त्यातून गोपनीय माहितीचा प्रसार, खोटी माहिती पसरवणे, तसेच शासकीय नियमांचे उल्लंघन होवू नये याकरिता मार्गदर्शक तत्त्वे आखण्यात आली आहेत.

सामान्य प्रशासन विभागाने जारी केलेल्या परिपत्रकानुसार, महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ हे सोशल मीडियाच्या वापराबाबतही लागू राहतील. या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ नुसार शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

**महत्त्वाच्या मार्गदर्शक सूचना**

राज्य शासनातील अधिकारी-कर्मचारी, स्थानिक स्वराज्य संस्था, मंडळे, महामंडळे, सार्वजनिक उपक्रम तसेच प्रतिनियुक्तीने किंवा करारपद्धतीने नेमलेले कर्मचारी यांना हे नियम लागू राहणार आहेत. शासनाच्या किंवा भारतातील कोणत्याही शासनाच्या चालू किंवा अलिकडच्या धोरणावर प्रतिकूल टीका करण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. तसेच सोशल मीडियाचा वापर जाणीवपूर्वक आणि जबाबदारीने करावा.

वैयक्तिक आणि कार्यालयीन सोशल मीडिया अकाऊंट स्वतंत्र ठेवावेत. केंद्र किंवा राज्य शासनाने बंदी घातलेल्या वेबसाईट किंवा ॲपचा वापर करू नये. शासकीय योजना व उपक्रमांच्या प्रसारासाठी केवळ अधिकृत आणि प्राधिकृत माध्यमांचा वापर करावा.कार्यालयीन कामकाजाच्या समन्वयासाठी व्हॉट्सॲप, टेलिग्रामसारख्या मेसेजिंग प्लॅटफ फॉर्मचा वापर करता येईल.

शासकीय योजनांच्या यशस्वितेसंदर्भात सोशल मीडियावर पोस्ट करता येईल; मात्र त्यातून स्वयंप्रशंसा होणार नाही याची दक्षता घ्यावी. वैयक्तिक अकाऊंटवर शासकीय पदनाम, लोगो, गणवेश, शासकीय मालमत्तेचे फोटो किंवा व्हिडिओ अपलोड करू नयेत. आक्षेपार्ह, द्वेषमूलक, भेदभाव करणारा मजकूर पोस्ट किंवा फॉरवर्ड करणे मनाई आहे. प्राधिकृत मंजुरीशिवाय कोणतेही गोपनीय दस्तऐवज सोशल मीडियावर अपलोड करू नयेत. बदली झाल्यानंतर कार्यालयीन सोशल मीडिया अकाऊंट योग्य प्रकारे हस्तांतरित करावे. शासनाने स्पष्ट केले आहे की, या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर शिस्तभंगात्मक कारवाई केली जाईल. डिजिटल युगात सोशल मीडियाचा जबाबदारीने वापर व्हावा आणि शासकीय यंत्रणेचा विश्वासार्हता अबाधित राहावी, यासाठी नियमावली करण्यात आली आहेत.

# नागपूर व महाराष्ट्राची सुपुत्री बुद्धिबळपटू दिव्या देशमुख यांचा सार्थ अभिमान-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## राज्य शासनातर्फे करण्यात येणार सन्मान

**नागपूर :-** नागपूर व महाराष्ट्राची कन्या बुद्धिबळपटू दिव्या देशमुख यांनी किशोरवयातच जागतिक बुद्धिबळस्पर्धेत विजेतेपद पटकावले असून "ग्रँड मास्टर' हा किताब मिळिवला आहे, त्यांची ही कामगिरी अभिमानास्पद असल्याचे सांगून राज्य शासनाच्या वतीने त्यांचा यथोचित सन्मान करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येथे सांगितले.

रामगिरी शासकीय निवासस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला. दिव्या देशमुख यांनी भारतीय बुद्धिबळपटू कोनेरू हम्पी यांना जागतिक बुद्धिबळ स्पर्धेच्या अंतिम सामन्यात पराभूत करून ही महत्त्वपूर्ण कामगिरी केली आहे. कोनेरू हम्पी यांचे अभिनंदन करत दिव्या देशमुख यांनी दुसऱ्यांदा या स्पर्धेत सहभाग घेत यशोशिखर गाठल्याचे त्यांनी सांगितले. दिव्या देशमुख यांनी वयाच्या १९ व्या वर्षी ही उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्यांनी आतापर्यंत विविध स्पर्धेत २३ सुवर्ण पदकांसह जवळपास ३५ पदके पटकावली आहेत.राज्य शासनाच्या वतीने सन्मान करण्यात येईल. याबाबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे यांच्याशी चर्चा करण्यात येईल असेही त्यांनी यावेळी सांगितले.




# पाण्याची टाकी पडल्याने आदिवासी विद्यार्थिनीचा मृत्यू

**अमरावती :-** पाण्याची टाकी पडल्याने आदिवासी आश्रम शाळेतील विद्यार्थिनीचा मृत्यू झाला असून तीन विद्यार्थिनी जखमी झाले आहेत. ही घटना अचलपूर तालुक्यातील नागापूर येथील आदिवासी आश्रम शाळेत घडली आहे. सुमरती सोमा जामुनकर असे मृत विद्यार्थीनीचे नाव आहे.

# गोंदिया जिल्ह्यात ५ ऑगस्टला मंडल यात्रेचे आगमन

- नवेगावबांध व आमगाव येथे होणार ओबीसी जनजागरण मेळावा
- युवक,विद्यार्थ्यामंध्ये अधिकार आणि कर्तव्याप्रती करणार जागृती
- ७ ऑगस्टला भंडारा येथे समारोप




**गोंदिया:-**ओबीसी, व्हीजेएनटी आणि एसबीसी विद्यार्थ्यांना ङ्कमंडल आयोगाबाबत जागृती करीत त्यांना त्यांचे अधिकार आणि हक्क समजावून सांगण्यासाठी ङ्कमंडल दिनानिमित्त विदर्भातील सात जिल्ह्यात मंडल आयोग जनजागृती यात्रा निघणार आहे. ही यात्रा २ ऑगस्टरोजी नागपूरातील सविंधान चौकातून रवाना होणार आहे. हि मंडल यात्रा ५ ऑगस्ट रोजी भंडारा जिल्ह्यातून गोंदिया जिल्ह्यातील अर्जुनी मोरगाव येथे सांय.४ वाजता दाखल होणार आहे.त्याच दिवशी सायकांळी ५ वाजता नवेगावबांध येथील ग्रीनपार्क येथे जनजागृती मेळावा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे.तर ६ ऑगस्टला आमगाव येथे सायंकाळी ५ वाजता ओबीसी,एस्सी एस्टी जागरण मेळावा आयोजित करण्यात आलेला आहे.या मंडल यात्रेच्या गोंदिया जिल्ह्यातील कार्यक्रमासंबधाने आज २७ जुर्लेला शास्त्रीवार्डातील चुटे भवन येथे ओबीसी संघटनाची बैठक पार पडली.या बैठकीत मंडल यात्रा यशस्वी करण्याच्या उद्देशाने नियोजन करण्यात आले.सोबतच ओबीसी विद्यार्थ्यांचे वसतिगृह प्रवेश तातडीने सुरु करणे आणि वसतिगृहाकरीता गोंदिया शहरात जागेचा शोध घेणे आदी विषयावर चर्चा करण्यात आली.

बैठकीला ओबीसी अधिकार मंचचे संयोजक खेमेंद्र कटरे,ओबीसी सेवा संघाचे उपाध्यक्ष सी.पी.बिसेन,संविधान मैत्री संघाचे अतुल सतदेवे,ओबीसी अधिकारी कर्मचारी संघटनेचे रवी अंबुले,प्रमोद बघेले, ओबीसी अधिकार मंचचे कैलास भेलावे,युवा बहुजन मंचचे सुनिल भोंगाडे,रवी भांडारकर,भारतीय पिछडा शोषित संघटनेचे प्रेमलाल साठवणे,ओबीसी सेवा संघाचे डॉ.भुमेश ठाकरे,डॉ.डी.पारधी,नरेश परिहार,सुनिल कुंभलकर,एस.एम .चित्रीव,उमेश कटरे,भुमेश शेंडे आदी ओबीसी बहुजन संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

ओबीसी व्हीजेएनटी,एसबीसी समाजातील विविध प्रश्न आणि त्यावरील उपायावर चर्चा, विद्यार्थी, युवक, अधिकारी, कर्मचारी यांच्यामध्ये जागृती, ओबीसींचे वसतिगृह, महाज्योती आणि ओबीसी आर्थिक विकास महामंळाच्या योजना, शिष्यवृत्तीचा लाभ, ओबीसींची जनगणना तसेच यात्रेच्या माध्यमातून ओबीसी हितासाठी गठित बी.पी. मंडल आयोगाच्या शिफारशींची माहिती ओबीसी समाजाला देऊन या शिफारशी आज परिस्थितीत शासनाने लागू करण्याची आवश्यकता या विषयावर जनजागृती करण्यात येणार आहे.यात्रेचा भंडारा येथे ७ ऑगस्ट २०२५ रोजी आयोजित करण्यात आलेला आहे

या यात्रेच्या यशस्वीतेसाठी ओबीसी युवा अधिकार मंच, ओबीसी अधिकार मंच,संघर्ष वाहिनी,ओबीसी संघर्ष कृती समिती,ओबीसी सेवा संघ,संविधान मैत्री संघ,भारतीय पिछडा शोषित संघ, स्टु?डटंस राईटस असो.,युवा बहुजन एकता मंच सर्व समाज ओबीसी मंच,आता लढूया एकीनेच सारख्या अन्य बहुजन ओबीसी संघटनांचा सहभाग राहणार आहे.

# मित्राला पराभवाचा स्वाद चारत सुनिलभाऊंनी बँक घेतली पुन्हा ताब्यात

**भंडारा :-** भंडारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत काँग्रेसचे विद्यमान खासदार डॉ. प्रशांत पडोळे यांचा मोठ्या फरकाने पराभव करीत दुग्ध सहकारी संस्था गटातून राष्ट्रवादी (अजित पवार) गटाचे नेते सुनिल फुंडे यांनी त्यांचा ४४ मतांनी पराभव केला. हा पराभव खासदार पडोळे यांचा नसून एकेकाळी सुनिलभाऊंच्या खांद्यावर आपल्या निवडणुका लढून विजय मिळिवणार्या काँग्रेसच्या माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोलेंचा असल्याचा सूर आवळला जात आहे.

भंडारा लोकसभा मतदारसंघात नानाभाऊ व सुनिलभाऊ ही जोडी मैत्रीची एक वेगळीच ओळख होती. सुनिलभाऊ राष्ट्रवादीत असतानाही नाना पटोले हे भाजपकडून खासदार झाल्यावरही त्यांनी मैत्रीला टिकवून ठेवण्याचाच प्रयत्न केला. मात्र त्यानंतर काँग्रेसमध्ये परत



आल्यानंतर झालेल्या राजकीय घडामोडीत दोन्ही मित्रामध्ये बिनसले आणि त्या बिनसलेल्या मैत्रीने पहिल्यांदा विधानसभेच्या निवडणुकीतच नानांना धक्का दिला, अवघ्या काही मतांनी निवडून यावे लागले. त्यानंतर आता बँकेच्या निवडणूकीत साकोली तालुक्यातील सेवा सहकारीसह खासदारला पराभूत करुन सुनिलभाऊंनी आपल्याशी झालेला दगाफटका या विजयातून चुकता केल्याची चर्चा सुरु झाली आहे.

बँकेचे विद्यमान अध्यक्ष व राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते सुनिल फुंडे यांच्या नेतृत्वातील महायुतीच्या सहकार पॅनलला ११ जागा मिळाल्या, तर, काँग्रेसचे खासदार डॉ. प्रशांत पडोळे आणि आमदार नाना पटोले यांच्या नेतृत्वातील परिवर्तन पॅनलला फक्त ४ जागा मिळाल्या. यामुळे आता सुनिल फुंडे यांचा अध्यक्षपदाचा मार्ग दुसऱ्यांदा मोकळा झाला आहे. असे असले तरी, न्यायालयाच्या निर्णयामुळे ५ गटामधील ६ जागांचा निकाल रोखून ठेवण्यात आला आहे.

२१ संचालकपदासाठी ही निवडणूक २७ जुलैला घेण्यात आली होती. यात महायुतीचे सहकार पॅनल आणि काँग्रेसचे परिवर्तन पॅनल रिंगणात होते. विविध २० गटांमधून ४६ उमेदवार मैदानात होते. मतदार यादीवर घेतलेल्या आक्षेपावरून मतदानाच्या आदल्या दिवशी उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने पाच गटातील निकाल पुढील निर्णयापर्यंत रोखून ठेवण्याचे आदेश दिले होते. त्यामुळे ५ गटांमधील ६ जागांचे निकाल सोमवारी जाहीर करण्यात आले नाहीत.

## काँग्रेसच्या गटाला हादरा, आत्मचिंतनाची गरज

**सहकार क्षेत्रातील या निवडणुकीने काँग्रेसला जोरदार हादरा दिला आहे. दुग्ध सहकारी संस्था गटातून खुद्द खासदार प्रशांत पडोळे उमेदवार होते. आमदार नाना पटोले हे सुद्धा पॅनलच्या विजयासाठी प्रचारात उतरले होते. मात्र या दोन्ही दिग्गजांची ताकद पॅनलला वाचवू शकली नाही.वास्तविक खासदार पडोळे हे लोकसभेत ज्या पध्दतीने विजयी झाले,त्यानंतर त्यांना आपण खुपच लोकप्रिय नेते असल्याचा भास झाल्याने दुग्धसंघापाठोपाठ जिल्हा बँकेतही स्वतः निवडणुकीत उतरण्याचा निर्णय घेतला. गेल्या खासदारकीच्या वर्षभरातील कार्यकाळाकडे बघितल्यास ठोस असा कुठलाच कार्य दिसून येत नाही. त्यातच भाजप व राष्ट्रवादी एकत्र आल्याने महायुतीची बाजू भक्कम झालेली होती. परंतु स्वतःला काँग्रेसचे सर्वेसर्वा समजून मी म्हणजेच काँग्रेस हे घेऊन चाललेल्या नेत्यांमुळेच भंडाराच नव्हे तर गोंदियातील बँकही हातातून गेली ही चर्चा राजकारणात सुरू झाली आहे.**

सामाहिक **बेरार टाईम्स** निर्भिड, निष्पक्ष लोकप्रिय साप्ताहिक http://berartimes.com बुधवार, दि.३० जुलै २०२५ 

## संपादकीय

# बुद्धिबळ स्पर्धेतील विजेती दिव्या पहिलीच भारतीय महिला

भारतात उदारीकरणाचे पर्व सुरू झाल्यानंतर सारे चित्र पालटले आणि महिलांची सर्वच क्षेत्रांत पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून भाग घेण्याची चढाओढ सुरू झाली. आता जागतिक बुद्धिबळ स्पर्धेतही भारतीय महिलांनी आपला झेंडा उंचच ठेवला आहे. जॉर्जियातील बाटुमी येथे सुरू असलेल्या विश्वचषक बुद्धिबळ स्पर्धेत दिव्या देशमुख आणि कोनेरू हम्पी यांच्यात पहिला डाव बरोबरीत सुटला; परंतु त्यानंतर टायब्रेकरमध्ये महाराष्ट्राच्या दिव्या देशमुखने कोनेरू हम्पीला नमवत विश्वचषकावर आपले नाव कोरले. भारतासाठी ही गौरवास्पद बाब आहे. अंतिम फेरीत भारताच्याच दोन्ही महिला एकमेकांसमोर होत्या. त्यामुळे कुणीही जिंकले असते तरी चषक भारताकडेच येणार होता. यावरून ही बाब स्पष्ट झाली की, भारतीय महिला क्रीडापटू आपला झेंडा उंचावण्यासाठी सदैव तत्पर असतात.

हा सामना ऐतिहासिक होता याचे कारण असे की, दोन्ही भारतीय महिला सुवर्ण आणि रौप्य चषकासाठी लढत होत्या. ही स्पर्धा २०२६ च्या फिडे बुद्धिबळ स्पर्धेसाठी पात्रता फेरीची लढत समजली जाईल. भारतीय महिलांसाठी हा क्षण ऐतिहासिक आहे, कारण या पूर्वी कोणत्याही महिलांनी बुद्धिबळ स्पर्धेत असे यश मिळवले नव्हते. कोनेरू हम्पी ही आंध्र प्रदेशची तर दिव्या देशमुख ही नागपूरची. दोघींनीही आपल्या अगोदरच्या सामन्यात अभूतपूर्व कामगिरी केली आहे. भारतीय महिलांचे कौतुक करत असतानाच एक बाब मात्र स्पष्टपणे जाणवते की, आमच्या महिलांनी सर्व क्षेत्रात अभूतपूर्व कामगिरी केली आहे. पुरुषांइतक्याच स्त्रिया क्रीडा विश्वातही अढळ स्थान निर्माण करू शकतात हे या दोघींनी दाखवून दिले आहे.

अर्थात महिला बुद्धिबळ विश्वात अजून खूप मागे आहेत. १९८० पासून त्या बुद्धिबळ क्रीडा विश्वात आहेत पण फार थोड्यांनी अव्वल बुद्धिबळ स्पर्धेतील विजेते म्हणून झेप घेतली आहे. भारतात महिलांप्रती असलेली एकप्रकारे तुच्छ भावना सर्व खेळांमध्ये आहे. त्यात क्रिकेटमध्ये तर जास्तच आहे. पण आता महिला क्रिकेट खूप लोकप्रिय झाले आहे. बुद्धिबळ स्पर्धा पाहण्यासाठी जॉर्जिया येथे काल भरपूर प्रेक्षक जमले होते आणि ते दिव्या आणि कोनेरू हम्पी यांना चिअरअप करत होते. हे खूप आश्वासक चित्र आहे. एक काळ असा होता की, महिला या बुद्धिबळ स्पर्धा खेळण्यास शारीरिकदृष्ट्या सक्षम नाहीत असे समजले जात होते. आज अशी परिस्थिती राहिली नाही आणि ऑलिम्पिक असो की बुद्धिबळ असो, सर्वच क्षेत्रातील पुरुषांची मक्तेदारी मोडून काढण्यात महिला यशस्वी झाल्या आहेत.

या सामन्यात कोण जिंकले किंवा कोण हरले हे महत्त्वाचे नाही. महत्त्वाचे आहे की, महिलांनी जबरदस्त झेप घेतली आहे आणि तिचे ऐतिहासिक महत्त्व आहे. या स्पर्धेतून ५० हजार अमेरिकन डॉलर भारतात येणार आहेत. त्यामुळे मिळणारे मानधनही महिलांसाठी प्रेरणादायी ठरू शकते. काही भारतीयांचे मत असे आहे की, अशा स्पर्धा तरुण मुलींना नवनवीन क्षेत्रे पादाक्रांत करण्यासाठी प्रेरणा देतील. महिला गट आणि पुरुष गट स्पर्धेतील येणारा पैसा यात खूप फरक असतो. क्रिकेटमध्ये तर पुरुषांच्या स्पर्धांच्या तुलनेत महिलांना मिळणारे मानधन यातील तफावत पाहिली तर डोके चक्रावून जाते. पण बुद्धिबळ स्पर्धेत एवढी रक्कम येणार आहे हे पाहून अनेक महिला बुद्धिबळ खेळाकडे आकर्षित होतील. दिव्याच्या या अविस्मरणीय विजयामुळे भारतीय महिलांची बुद्धिबळासाठीची क्रेझ आणखी वाढेल यात शंका नाही.

भारतात अजूनही ग्रँडमास्टर्स फार कमी आहेत. २०२३ च्या आकडेवारीनुसार फक्त २३ महिला ग्रँडमास्टर्स होत्या. अनेक आई-वडील आपल्या मुलींना बुद्धिबळाकडे वळू देण्यास नाखूश असतात. ही एक अडचण आहे. तरीही या सर्व परिस्थितीवर मात करून फिडे आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेतील विजेतेपद भारतातील महिलांचे सहभागाचे चित्र बदलेल अशी आशा वाटते. पाच वेळा विश्वविजेता झालेला विश्वनाथन आनंद म्हणाला की, दिव्या देशमुख हिने फार मोठी प्रगतीची झेप घेतली आहे. ग्रँडमास्टर अभिजीत कुंटे यांच्या मतानुसार, दिव्या कधीही नवीन प्रयोग करण्यास घाबरली नाही. दिव्यासाठी ही एक जबरदस्त मोहीम होती, कारण महिला विश्वचषकाच्या अंतिम फेरीत प्रवेश करणारी ती पहिली होती.

३८ वर्षीय कोनेरू ह्मपीच्या निम्म्या वयाच्या दिव्याने घेतलेली झेप अनेकांना प्रेरणादायक आहे. दिव्या आणि हम्पी यांच्यातील हा सामना असंख्य किशोरवयीन तरुणींसाठी प्रेरणादायक ठरेल आणि दिव्याच्या म्हणण्यानुसार सोप्या पद्धतीने विजय मिळवण्यात काय अर्थ असतो, विजय मिळवला पाहिजे तो तगड्या प्रतिस्पर्ध्यावर विजय मिळवून. तिच्या या मानसिकतेमुळेच आज तिने चिवट लढतीनंतर विश्वचषकावर नाव कोरले आहे. ती अत्यंत सकारात्मक पद्धतीने खेळते आणि बुद्धिबळाकडे पाहण्याचा हाच दृष्किोन महत्त्वाचा असतो आणि तो दिव्याला इतर खेळाडूंपेक्षा वेगळा करतो. दिव्या आधीच कँडिडेट्स टूर्नामेंटसाठी पात्र ठरली आहे, जे बुद्धिबळ विश्वविजेतेपदाच्या वाटचालीतलं एक महत्त्वाचं पाऊल आहे. दिव्या देशमुख आता केवळ वर्ल्डकप विजेतीच नाही, तर तिने या ऐतिहासिक विजयासोबत ग्रँडमास्टरचा मानही मिळवला आहे. दिव्याने अनुभवी आणि उच्च मानांकन असलेल्या कोनेरू हम्पीचा पराभव करत हे प्रतिष्ठेचे विजेतेपद आपल्या नावे केले. असे विजेतेपद पटकवणारी ती पहिलीच भारतीय महिला ठरली आहे.

# शेतकरी आत्महत्या : एक BitterReality

'दासबोध' या सुप्रसिद्ध काव्यग्रंथामध्ये रामदासांनी वर्णिलेल्या मुर्खपणाच्या लक्षणांपैकी एका लक्षणाचे अनुसरण करून सांगू इच्छितो की, शासकीय सेवेत कार्यक्षमता, कामाचे सर्वोत्कृष्ट, सकारात्मक, टिकाऊ परिणाम देणारे, इमानदारी, भ्रष्टाचाराला ना, चापलूसीला नकार देणारे कार्यफ्र यांची कोणतीही सकारात्मक दखल घेतली जात नसली तरी अशा अधिकारी/कर्मचाऱ्यांना गधा बनवून त्याच्यावर जास्तीत जास्त भार मात्र हमखास टाकला जातो, अशांपैकीच मी एक होतो.

मी, TARCS/तालुका सहकार निबंधक असताना माझ्याकडे एका बिमार कृषी उत्पन्न बाजार समितीचा एकल प्रशासकीय प्रभार सोपविण्यात आला होता. तेव्हा त्या बाजार समितीकडे पैशाचा ठणठणाट होता, कर्मचाऱ्यांचे पाच-सहा महिन्यांचे वेतन थकले होते. एवढेच नव्हे तर, पीएफचे व कर्मचारी पत संस्थेकडील कर्जाचे हप्तेही थकले होते.

अशा अवस्थेत मी प्रशासक पदाचा पदभार घेतल्याच्या आठ-नऊ महिन्याच्या कालावधीतच, योग्य व कायदेशीर प्रशासनाद्वारे मी ती बाजार समिती कायम आर्थिक व प्रशासनिक स्थिरतेमध्ये आणू शकलो व माझा अल्पकालिक प्रशासकीय कालावधी संपतांना त्या बाजार समितीच्या खळखळाटी बँक खात्यात लाखो रुपये जमा झालेले होते. शेतकऱ्यांना त्यांचे धान्योत्पादन कोणत्याही दलाल-व्यापारी यांच्या अवास्तव/अवाजवी दडपणाशिवाय विकता येणे शक्य झाले होते, कारण बाजार समितीच्या क्षेत्रात प्रत्येक दहा किमीवर धान्य संकलन केंद्र उघडून शेतमाल विक्रीची व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आलेली होती.

याशिवाय, नंतर थोड्याच कालावधीत, मी ज्यावेळी तालुकाप्रमुख अधिकारी होतो तेव्हा माझ्याकडे चार तालुक्यांचा अतिरिक्त प्रभार असतानाही मला अविभाजित भंडारा जिमस बँक,भंडारा या गंभीररीत्या समस्याग्रस्त व आर्थिक अनियमिततेमुळे डबघाईकडे वाटचाल करीत असलेल्या जिल्हा बँकेचा एकल प्रशासक व त्याच अविभाजित भंडारा जिल्ह्याचा DDR असे आणखी दोन महत्वाचे प्रभार सोपविण्यात आले होते. इतक्या कार्यभारातही सुयोग्य प्रशासनिक, व्यवस्थापकीय व वैधानिक क्लृप्त्या तथा अनवरत प्रयत्नांनी मी ते कायमस्वरूपी यशस्वी ठरणाऱ्या/ठरलेल्या पद्धतीने ङ्गपारङ्गही पाडले. अस्थिर व अव्यवस्थित स्थितीत आलेल्या बँकेचा कारभार बँक कर्मचारी, अधिकारी व शेतकरी यांच्या सुयोग्य समन्वयाने सुस्थिर, सुव्यवस्थित व अर्थक्षम केल्यावरच मी स्वमर्जीनेच/स्व-विनंती करून बँकेचे प्रशासकीय पद सोडले होते.

तसेच त्यानंतर मी चंद्रपूर जिल्ह्यात DDR/जिल्हा सहकार निबंधक म्हणून काम करताना तिथे सुमारे ५०% कर्मचारी/अधिकाऱ्यांची पदे रिक्त असतांनाही उपलब्ध कर्मचाऱ्यांना सेल्फ-मोटिव्हेट करून केलेले धडाकेबाज व सुपरिणामकारक असे सहकार व पणन विषयक काम तथा महाराष्ट्रात प्रथम क्रमांक प्राप्त शेतमाल तारण योजनेची यशस्वी राबवणूक करू शकलो. (जिल्ह्यातील सर्वच्या सर्व बाजार समित्या एकाचवेळेस बरखास्त करून बाजार समितीच्या सचिव व प्रशासकांच्या मदतीने मला हे कार्य पार पाडता आले होते.) या शेतमाल तारण योजनेचा दृश्य फायदा असा झाला की, चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमाल विक्रीतून एकाच वर्षात सुमारे अडीच कोटी रुपयांचा अतिरिक्त लाभ मिळू शकला. याच दरम्यान केंद्र शासनप्रणित व नाबार्डद्वारे संचालित ग्रामीण गोदाम बांधणीच्या योजनेत देशस्तरावर उल्लेखित काम करण्यात आल्याची नोंद केंद्र शासनाच्या स्तरावर घेण्यात आल्याची बाब तत्कालीन खासदार श्री नरेशजी पुगलिया यांनी माझ्या नजरेस आणून दिली होती. अशी ही यशस्वीता लक्षात घेऊन मला तत्कालीन मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांच्या आदेशान्वये मे २००६ मध्ये यवतमाळ या "शेतकरी आत्महत्या" करिता जगभर कुप्रसिद्ध झालेल्या जिल्ह्यात ऊऊब म्हणून स्थानांतरीत करण्यात आले व शेतकरी आत्महत्या हा विषय गांभीर्याने हाताळण्याचे निर्देश देण्यात आले.

त्याबरहुकुम, मी १५.०५.२००६ ला यवतमाळ येथे रूजू झालो आणि पहिल्यादिवसापासूनच सभांचा मारा सुरू झाला. मी रुजू झाल्यापासून म्हणजे १५.०५ पासून २०.०५ पर्यंत कार्यालयात उपस्थितच होऊ शकलो नव्हतो, सभांच्या 'अतिरेका'पायी! तेथील बहुतांश स्टॉफने तोपर्यंत मला पाहिले सुद्धा नव्हते. अशा अवस्थेतही तेथेच सात-आठ वर्षापासून बंद अवस्थेत असलेल्या, बोदेगाव येथील जयकिसान सहकारी साखर कारखान्याचा मला एकल अवसायक नेमून कारखाना सुरू करण्याचे व्यामिश्रतम काम सोपविण्यात आले. वारणा समूहाच्या सहकार्याने नऊ-दहा महिन्याच्या कालावधीतच मी तो बंद ससाका पूर्ण क्षमतेने चालू करण्यात व संपूर्ण विदर्भात रेकॉर्ड क्रशिंग करण्यात यशस्वी सुद्धा ठरलो होतो. त्यामुळे परिसरातील उस उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाचा वाजवी दर त्यांच्या परिसरातच मिळू लागला होता. पर्यायाने ससाका चे अधिकारी/कर्मचारी व संबंधित शेतकरी दोन्ही पक्ष त्यामुळे सुखावले होते. (परंतू तेथील एका शक्तीशाली राजनेत्याचे अनधिकृत काम करण्यास मी नकार दिल्याने मला येवतमाळ येथून बदलून जावे लागले. मी यवतमाळ येथून बदलून जाताच वर्षभरातच तो ससाका पुन्हा बंद पडला तो आजतागायत.)




यवतमाळचे तत्कालीन धडाकेबाज व लोकाभिमुख प्रशासनासाठी सुप्रसिद्ध असलेले जिल्हाधिकारी मा.डॉ.श्री.हर्षदीप कांबळे सरांकडे माझे नाव अगोदरच पोचवण्यात आले होते. त्यांची सदिच्छा भेट घेतली तेव्हा त्यांनी मला यवतमाळ ची वस्तुस्थिती व परिस्थितीची कल्पना देऊन कामाची दिशा कशी ठेवावी याबद्दल मार्गदर्शन करून तसा रोडमॅप तयार करायला सांगितले. त्यानुसार मी प्राथमिक कार्यदिशादर्शक One Page Road-Ma तयार केला व त्यांना तो दाखवला. त्यांनी तो पाहिला व समाधान व्यक्त करून सांगितले की प्रथम जिल्ह्याच्या दौरा करून समस्येचे स्वरूप समजून घ्या.

कार्यालयीन ॲम्बेसेडर कार खूप जूनी खटारा गाडी होती. ॲव्हरेज होता ३-४ किमी प्रति लिटर पेट्रोल!! त्यामुळे मला स्वतःची वैयक्तिक गाडी वापरण्याशिवाय पर्यायच नव्हता. कधीकधी जिल्हा बॅन्केची गाडीसुद्धा वापरायचो. (अशा परपरिस्थितीत मी स्वतःची गाडी शासकीय कामासाठी वापरण्यास शासन निर्णयांनुसार पात्र असूनही व माझ्यासारख्याच दुसऱ्या एका माझा मित्र असलेल्या ऊऊब ला स्वतःचे वाहन अशाप्रकारे वापरण्यास व त्यासाठी विहित खर्चाची परिपूर्ती करण्यास परवानगी असूनही व मी वारंवार विहित पद्धतीने विनंती/अर्ज करूनही मला मात्र "अशी" परवानगी "मंत्रालया"तून नाकारण्यात आली होती. मंत्रालयातील ही झारीतील शुक्राचार्याची भूमिका कधीच बदलू शकणार नाही!! हे महाराष्ट्राचे दुर्दैवच म्हणावे लागेल. असो.)

माझ्या त्या जिल्हा-दौऱ्यांत ग्राविका संस्थांचे संचालक मंडळ, गटसचिव, कृऊबासचे संचालक मंडळ, सचिव, बॅन्केचे संचालक मंडळ व फिल्ड स्टॉफ, पत्रकार बंधू, इतर सामाजिक संस्थांचे पदाधिकारी, आमदार महोदय, इतर सहकारी संस्थांचे पदाधिकारी व कर्मचारी इ. सोबत झालेल्या सखोल अशा प्रत्यक्ष चर्चेअंती निघालेला माझा निष्कर्ष पाहू जाता, शेतकरी आत्महत्येची दोन प्रमुख कारणे म्हणजे

(१) शेतकऱ्यांच्या "परंपरागत प्रतिष्ठेला" आणि "संवैधानिक अधिकारां"ना १८ जून १९५१च्या पहिल्याच संविधान संशोधनाने (व तद्जनित नवनिर्मित परिशिष्ट ९ ने) व त्यानंतरच्या विविध शेतकरी-विरोधी कायद्यांद्वारे जाणीवपूर्वक लावण्यात आलेला/लागलेला सुरूंग !!!

(भारतीय संविधान दि २६ जानेवारी १९५० ला अधीस्वीकृत केल्याच्या फक्त १५-१६ महिन्यातच दि.१८ जून १९५१ ला त्यात करण्यात आलेल्या पहिल्या संविधान संशोधनाची कटूतम स्थिती व तिचे दुष्परिणाम जाणून घेण्यासाठी जिज्ञासूंनी Tiurdaman Singh यांचा शोधग्रंथ : SIXTEEN STORMY DAYS, The Story of the First AMENDMENT to the Constitution of खप-वळर अवश्य, अभ्यासपूर्वक, वाचावा अशी विनंती आहे.)

(२) गरीब, गरीबी, गरीबी हटाव, रोजगार हमी योजना, तथा अनर्थकारक, अनैसर्गिक व असामाजिक अशी सरसकट फुकट/अत्यल्प किमतीत अन्नधान्य वाटप योजना, ... सारख्या स्वप्नाळू, अव्यवहारी, लांगुलचालनात्मक, अविचारी, शेतकरी-दुष्ट, अशा संकल्पनांची निसर्ग-विरोधी, समाजविज्ञान-विसंगत व आत्मघाती अशा शेतकरी-विनाशक शासन-धोरणांची दबंग राबवणूक सुद्धा! ..... (आता हा सुरूंग कसा लागला, ही मात्र "लंबी कथा" आहे. तसेच उक्त दुसऱ्या कारणाची चिकित्सा व चिरफाड सुद्धा त्या "लंबी कथा"चाच विस्तारित भाग आहे.)

शिवाय १९४७ पासूनच अनैसर्गिक, निसर्गविरोधी, पर्यावरणद्वेष्टी, ग्रामसंस्कृती-विनाशक व शेतकरीविनाशक कृषी धोरण व शेतकरी विरोधी अनेक कायद्यांचा धुमाकूळ व ते असंवैधानिक ठरू शकणारे कायदे परिशिष्ट ९ च्या अनैतिक कवचाखाली जबरदस्तीने राबविण्याच्या पाश्चात्य विचारसरणीच्या तत्कालीन शासन-धूरीणांची तथाकथित पोथीनिष्ठ साम्यवादी (हिमनगपृष्ठवादी) "अर्थनिती" व "विकास(?)-निती" सुद्धा याला कारणीभूत असल्याचे निष्कर्ष हाती येऊ लागले. शाश्वत व सर्वसमावेशक असा टिकाऊ/सम्यक विकास भारतात तरी फक्त आणि फक्त "परिसर वैशिष्ट्यांचा विकास" म्हणजेच पर्यायाने कृषी-ग्राम-वन-विकासातूनच साधता येऊ शकतो हे आज अद्ययावत विज्ञानाने व पर्यावरणशास्त्राच्या अभ्यासाने, शिवाय कोरोनाच्या प्रकोपाने सुद्धा, निर्विवादपणे सिद्ध केलेले सत्य ठरत/ठरले आहे. तथापि हे "सत्य" नाकारण्याच्या (आजच्याही) शासकीय कृषी धोरणातच शेतकरी आत्महत्येचे गूढ लपलेले(?) आहे, हे स्पष्ट होत गेले. सारांशाने शासन व्यवस्थेचे, गांधी-विनोबा-राष्ट्रसंत तुकडोजी महाराज-गाडगे बाबा यांच्या विचारापासून झालेले, १८०? चे विचलन सुद्धा याला कारणीभूत असल्याचे निष्कर्ष पुढे येऊ लागले.

"उजाखा"च्या १९९१च्या प्रयोगानंतरही फक्त शेती-ग्राम-वन-क्षेत्रालाच "उजाखा"चे लाभ नाकारण्यात(!) आले. उणे(-)७२ टक्के सबसिडी कृषीक्षेत्राला देण्यात आल्याचे/येत असल्याचे भारतीय शासनाच्या अधिकृत दस्तावेजात आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्य करूनही शेतकऱ्यांना "लूटवापसी" करण्याऐवजी "कर्जमाफी" चे गाजर देण्याचे धोरण राबविण्यात आले व येताहेत. औद्योगिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, आर्थिक, सामाजिक इ. सर्व विकास सुद्धा आवश्यकच नव्हे तर अनिवार्यही आहेत; पण या सर्वांचा पाया व मूलभूत आधार फक्त आणि फक्त कृषी-ग्राम-वन-विकासाच्या म्हणजेच व पर्यायाने "develoment of the like of the AREA" या विज्ञानसंमत व निसर्गस्नेही अशा मूलभूत धोरणावरच आधारित असते, हे विश्वसत्य विसरल्यानेच आजची शेतकरी आत्महत्येची विदारक स्थिती उद्भवलेली आहे.

मुंबई, दिल्ली, ... सारख्या एकांगी नागरी मानसिकतेच्या कुप्रभावाने ग्रसित असलेल्या ठिकाणी वातानुकूलित चेम्बर्समध्ये बसून कळाहीन व कणाहीन विचार प्रसवणाऱ्या (?) तथाकथित सर्वज्ञां(?)ना हे पटणार नाहीच.

(रामचंद्र गुहा यांनी सुचविलेल्या व नीती आयोगाने आता पुरस्कृत केलेल्याप्रमाणे शासनसेवेत तज्ज्ञांच्या समावेशाची प्रक्रिया खरोखरच विवेकाधीन, निस्पृहपणे व पारदर्शक पद्धतीने स्वीकारण्यात/राबवण्यात आली तरच काही फरक पडू शकतो. पण ब्रिटिशकालीन संस्कृतीच्या व्हीआयपी, सरंजामी व शसेळीं ोवश मधील सध्याची भारतीय नोकरशाही (काही अगदी मोजके अपवाद वगळता) यात काही सकारात्मक बदल करू शकेल असे मलातरी वाटत नाही.) आणि हे पटल्याशिवाय म्हणजेच, वर संक्षिप्त रूपात मांडलेल्या, पायाभूत समस्येचे निदान व त्यावरील भारतीय पद्धतीची मूलभूत व परिसर वैशिष्ट्यांच्या विकासाला प्राथम्य आणि प्राधान्य देणारी सर्वंकष उपाययोजना, कोणत्याही पूर्वग्रहांना बळी न पडता, अवलंबिल्याशिवाय, शेतकरी आत्महत्येचे व शेतकरी-निर्मुलना(?)चे सत्र थांबेल असे भविष्य मला, सध्या तरी दिसत नाही.

(हे माझ्या निष्कर्षाचे फक्त संक्षिप्त टिपण मात्र आहे. पार्श्वभूमी लक्षात यावी म्हणून आत्मपूराण लांबवावे लागले आहे, त्याबद्दल क्षमस्व.)

(माझे ब्रीदवाक्य, DISSENT : THE VOICE OF$ PROGRESS, ला अनुसरून सांगू इच्छितो की, आजकाल कोणाच्याही भावना कोणत्याही कारणाने दुखावण्याची शक्यता वाढलेली आहे, सबब माझ्या या लिखाणाने कोणाच्याही भावना दुखावल्यास क्षमस्व.)

**ॲड.लखनसिंह कटरे,**
(निवृत्त डीडीआर) बोरकन्हार-४४१९०२, जि.गोंदिया.

# मृतक भगवानी आहूजा यांचे नेत्रदान

**गोंदिया :-** भावी पिढीने अधःकारमय जग प्रकाशमान करण्यासाठी करण्याबाबत नेत्रदान आरोग्य विभागामार्फत जनजागृती करण्यावर विशेष जोर देण्यात येत आहे. त्यानुषंगाने मृतक भगवानी आहुजा यांचा आकस्मिक मृत्यू झाला. दरम्यान त्यांच्या कुटुंबातील सदस्यांनी लगेच मृतकाच्या नेत्रदानाचा निर्णय घेवून मोलाचे काम केले आहे.

भगवानी आहुजा यांचा २० जुलै रोजी आकस्मिक मृत्यू झाला. दरम्यान कुटुंबाने लगचे मृतकांचे नेत्रदान करण्याचे ठरवले. इतक्या कठीण परिस्थिती ही नेत्रदानाची शहररातील इच्छा दर्शवली व घरातील परिवारातील सदस्य यांनी नेत्रमित्र नरेश लालवानी व नेत्र समुपदेशक भाविका बघेले यांच्याशी संपर्क साधला. केटीएस जिल्हा सामान्य रुग्णालयातील नेत्रदान समुपदेशक भाविका नागपुरे/बघेले व नेत्रदान सहाय्यक रीता विजय अरोरा यांच्या सहायाने नेत्रदानाची प्रक्रिया ही पूर्णपणे पार पाडण्यात आली. यासाठी सिंधी सेवादारी मंडळ अध्यक्ष कपीक होतचंदानी महेश हसीजा यांनी महत्वाची कामगिरी पार पाडली. तसेच रुग्णालय प्रशासनाकडून आहुजा कुटुंबाला प्रमाणपत्र देण्यात आले.



# नागपंचमीनिमित्त दीडशे वर्षांपासून "सर्फी' गायन व वारूळ पूजनाची परंपरा आजही कायम



**गोंदिया:-** नागपंचमी हा सण ग्रामीण भागात मोठ्या उत्साहात व परंपरागत साजरा केला जातो. गोरेगाव तालुक्यातील अनेक गावात नागपंचमीनिमित्त "सर्फी' गायन व वारूळ पूजनाची परंपरा असली तरी सटवा येथे आजही दीडशे वर्षांपासूनची परंपरा कायम असून वारूळ पूजनानंतरच गावात पूजा केली जाते.

भारतात अनेक सण-उत्सव मोठ्याप्रमाणे साजरे केले जात असले तरी दिवसेंदिवस त्यात बदल पहावयास मिळत आहे. अनेक सण-उत्सवाना प्रथा परंपरा असून आजही रीतिरिवाजाप्रमाणे सण-उत्सव साजरे केले जात आहेत. नागपंचमी हा सण मोठा नसला व फक्त सापापर्यंतच मर्यादित असला तरी या सणाला ग्रामीण भागात अमर्यादित महत्व असल्याचे दिसून येते. गोरेगाव तालुक्यातील सटवा येथे आजही दीडशे वर्षांपासूनची परंपरा कायम असून "सर्फी' गायन व वारूळ पूजनानंतरच गावात पूजा केली जाते. "सर्फी' म्हणजे नाग देवताच्या संबंधाने असलेले गाणे होत. गावातील आधीपासून गुरु मानलेल्या व्यक्तीच्या येथे नाग देवताचे 'ठाण'असू त्या ठिकाणी "सर्फी'ची दीक्षा घेतलेले गावातील व्यक्ती जमा होतात. त्यानंतर "सर्फी'गायन करीत ही मंडळी गावातील सीमेत असलेल्या वारुळाचे "सर्फी' गायन करून पूजन केले जाते. त्यानंतर गावातील सर्व मंदिरात "सर्फी'गायन करीत पूजा केली जाते. विशेष म्हणजे त्यानंतरच गावकरी आप आपल्या परीने नागदेवता ची पूजा करतात. "सर्फी'गायन व वारूळ पूजनाची परंपरा ही मागील चौथी ते पाचवी पिढीपासून म्हणजेच जवळपास दीडशे- दोनशे वर्षांपासून असल्याचे सांगितले जाते. ही परंपरा आजही कायम असली तरी काळाच्या ओघात आधुनुकीकरणात नवीन पिढी पुढे येत नसल्याने ही परंपरा जतन करणारी ही पिढीच शेवटची तर ठरणार नाही ना? असाही प्रश्न निर्माण होत आहे.

## "सर्फी'म्हणजे काय?

**"सर्फी' म्हणजे नागदेवता संबधित मंत्र किंवा त्यासंबंधित गाणे होत. यांना एक विशिष्ट चालीने गायिले जाते. ङ्गसर्फीफ गायनसाठी विशिष्ठ पद्धतीने दीक्षा घेतली जाते. दीक्षा घेतलेल्या व्यक्तींना काही विशेष नियम व पथ्य पाळावी लागतात. ज्या व्यक्तीने संबंधित दीक्षा घेतली असेल त्यालाच "सर्फी'गायन व वारूळ पूजनाचा अधिकार असतो.**

**आमच्या आधीच्या चार पिढ्या म्हणजेच जवळपास दीडशे ते दोनशे वर्षांपासूनची ही गावात परंपरा आहे. यात फक्त "सर्फी'ची दीक्षा घेतलेल्यांनाच "सर्फी' गायन कर्ता येते.**

**भोजराज बघेले,गावकरी, सटवा**

# शाळा बंदी+शिक्षक बंदी+शिक्षण बंदी

महाराष्ट्रातील १८ हजार जिल्हा परिषद शाळा बंद होणार असल्याची माहिती राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधान सभेमध्ये दिली. जिल्हा परिषद शाळेची पटसंख्या २० पेक्षाकमी असल्याने राज्य सरकारकडून हा निर्णय घेतला जात आहे, अशी माहिती देण्यात आली आहे. या निर्णयामुळे ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थ्यांचे भविष्य टांगणीला लागले आहे. ज्यांच्याकडे पैसा असेल त्यांनी इंग्रजी माध्यमांच्या शाळेमध्ये प्रवेश घ्यावा, अन्यथा शिकू नये असेच सरकारचे धोरण दिसते.

राज्यात २०२५-२६हे शैक्षणिक वर्ष सुरू झाले असून या नव्या शैक्षणिक वर्षांत महाराष्ट्रातील अनेक शाळांमधील पटसंख्या कमी झाली आहे. अनेक जिल्ह्यातील शाळांमध्ये पटसंख्या वीस पेक्षा कमी झाली आहे. यामुळे कमी पटसंख्या असलेल्या शाळा आता बंद केल्या जाणार आहेत. याबाबत राज्य सरकारकडून पावसाळी अधिवेशनात माहिती देण्यात आली असून राज्यातील १८ हजार शाळांमध्ये विद्यार्थ्यांची पटसंख्या कमी झाली आहे. राज्यात जिल्हा परिषदच्या एकूण १ लाख ८ हजार शाळा आहेत. त्यापैकी १८ हजार शाळांमध्ये २० पेक्षा कमी पटसंख्या असल्याची नोंद करण्यात आली आहे. २० पेक्षा कमी पटसंख्या असणाऱ्या शाळा बंद केल्या जाणार आहेत. याउलट राज्यात ८ हजार गावात शाळाच नाही, अशी धक्कादायक बातमी वृत्तपत्रांनी दिली आहे. समग्र शिक्षण अभियानाचा अर्थसंकल्प ठरवण्यासाठी राज्य व केंद्र शासनाच्या शिक्षण विभागाची संयुक्त बैठक झाली. त्यात मयुडायसफ्च्या आकडेवारीनुसार राज्यात ८ हजार २१३ गावांमध्ये शाळांची सुविधा नसल्याचे शिक्षण विभागाने विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात मान्य केले आहे. १,६५० गावांमध्ये प्राथमिक,१६,५६३ गावे उच्च प्राथमिकविना शिवाय वीज, पाणी, स्वतंत्र शौचालयांचा अभाव राज्यातील ५ हजार ३७३ शाळांमध्ये वीज, ५३० शाळांमध्ये पिण्याचे पाणी, ३ हजार ३३५ शाळांमध्ये मुलींसाठी तर ५ हजार १२४ शाळांमध्ये मुलांसाठी स्वतंत्र शौचालय नसल्याचे स्पष्ट असताना या शाळांचे सबलीकरण करण्याऐवजी १८००० शाळा बंद करण्याचा घाट घातला जात आहे . १ हजार ६५० गावांमध्ये प्राथमिक शाळा, ६,५६३ गावांमध्ये उच्च प्राथमिक शाळा नसल्याचे निदर्शनास आले आहे, असे लेखी उत्तर शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी दिली आहे.

हे कमी की काय म्हणून कमी पटसंख्येच्या साडेचौदा हजार शाळांवर संक्रांत येणार आहे. कमी पटसंख्येच्या शाळांऐवजी आता समूह शाळांची निर्मिती करण्यासाठी धोरण निश्चित केले आहे. राज्यातील दुर्गम भागांमधील कमी पटसंख्येच्या शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मक्लस्टर स्कूलफ (समूह शाळा) सुरू करण्यात येणार आहे. त्यासाठी नंदुरबार येथील तोरणमाळ व पुणे जिल्ह्यातील पानशेत या दोन क्लस्टर स्कूलच्या धर्तीवर राज्यात आता सर्व ठिकाणी क्लस्टर शाळा उभारल्या जाणार आहेत. परिणामी कमी पटसंख्येच्या तब्बल १४ हजार ७८३ शाळांवर संक्रांत येणार आहे. राज्यातील सर्व शिक्षण उपसंचालक कार्यालयामार्फत येत्या १५ ऑक्टोबरपर्यंत क्लस्टर शाळा संदर्भातील प्रस्ताव सादर करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. शिक्षण हक्क कायद्यांतर्गत प्रत्येक मुलाला त्याच्या घराजवळ शिक्षण मिळणे अपेक्षित आहे. मात्र राज्यातील अतिदुर्गम भागात कमी पटसंख्या असणाऱ्या शाळांमधील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळत नाही. त्यामुळेच राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने या विद्यार्थ्यांसाठी व त्यांना विविध शैक्षणिक साधनसामग्री उपलब्ध होण्यासाठी क्लस्टर स्कूल (समूह शाळा) सुरू करण्याचा उपक्रम हाती घेतला. त्यावर अनेक शिक्षण तज्ज्ञांकडून टीकाही झाली. मात्र क्लस्टर शाळा सुरू करण्याच्या निर्णयाला राज्य शासनाने हिरवा झेंडा दाखवला आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण व इतर अभ्यास गटांनी सुचवलेल्या १८ पायाभूत सुविधा उपलब्ध असाव्यात, असे समूह शाळांबद्दल म्हटले जात असले तरी त्या सुविधा कितपत पूर्ण होतील हे सांगणे कठीण आहे. कमी पटसंख्येच्या शाळांमधून विद्यार्थ्यांना मोफत ने-आण करण्यासाठी शालेय बसची सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी. यासाठी विविध शासकीय निधी, सीएसआर यांचा वापर करावा. या प्रत्येक बसमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी सीसीटीव्ही, जीएसटी ट्रॅक्टरची सुविधा असावी व प्रत्येक बसमध्ये बिल्लाधारक चालक व महिला पर्यवेक्षक असावी, यासह इतरही सुविधा देण्याबाबत सुचविण्यात आले आहे, परंतु या सुविधा कागदावर राहतात की प्रत्यक्षात साकार होतात, याबाबतचे भाष्य करण्यासाठी कोणत्याही ज्योतिषाची गरज नाही.

क्लस्टरच्या माध्यमातून दहा किलोमीटर अंतरावर एक शाळासंकुल उभारण्याच्या सरकारच्या भूमिकेमुळे गावातील शाळा बंद होण्याची भीती असून राज्यभरातील १४ हजार ७८३ शाळा समायोजित (बंद) होण्याची शक्यता आहे. या निर्णयाचा परिणाम १ लाख ८ हजार विद्यार्थी आणि ३ हजार शिक्षकांवरही होणार आहे. हे विद्यार्थी ग्रामीण, आदिवासी पाडे,, दुर्गम भाग व शहरी झोपडपट्टीयातील असणार आहेत. त्यामुळे या विद्यार्थ्यांचे शिक्षण कायमचे शिक्षण कायमचे बंद होण्याची शक्यता शिक्षण तज्ञांनी व्यक्त केली आहे. ज्या गावची शाळा बंद होईल त्या गावातील विद्यार्थ्यांचे शिक्षण कायमचे बंद होण्याची शक्यता यामुळे निर्माण झाली आहे. कमी पटसंख्येच्या शाळा चालविणे आर्थिकदृष्ट्या परवडत नाही तसेच तेथील गुणवत्ता टिकवता येत नाही. त्यामुळे राष्ट्रीय शिक्षण धोरणात कमी पटसंख्येच्या शाळा समायोजित करण्याचे निर्देश देण्यात आले आहे, असा याबाबतचा सरकारचा युक्तिवाद आहे.

### शिक्षणावरील खर्च कमी

मागील चार वर्षात राज्य सरकारचे उत्पन्न वाढले, परंतु, शिक्षणावरील खर्च १८.१ टक्क्यांवरून १६.३ टक्क्यापर्यंत कमी खाली आला. सतत खर्च कपातीमुळे शाळाची अवस्था बिकट झाली आहे. शिक्षकांची रिक्त पदे, भौतिक सुविधांचा अभाव, अशैक्षणिक कामातून सुटका खेळाचे मैदान व साहित्य त्यासाठी प्रशिक्षित शिक्षक आदींची पूर्तता होऊ शकली नाही. त्यामुळे या शाळा आपसूकच गुणवत्ताहीन झाल्या. आता त्या मरणासन्न अवस्थेत आहेत. बंद होणाऱ्या मार्गावरील शाळांचे प्रमाण सर्वात जास्त विदर्भात आहे, त्या खालोखाल मराठवाड्?यातील आहे. गोंदिया : २१३, भडाराः १४१, नागपूर ५५५, चंद्रपूर ४३७, गडचिरोली ६४१, वर्धा : ३१८, यवतमाळ ३५०, अमरावतीः ३१४, अकोला: ११३, वाशीमः १३३, हिंगोली १३, नांदेड ३१४, बुलडाणाः १५८, परभणी। १२६, लातूरः २०१, धाराशिव १७४, जालनाः १८४, बीडः ५३३, सोलापूर ३४१, जळगाव १०७ छत्रपतीसंभाजीनगरः ३४७, नगर ६१५, नंदूरबार १८१, बुळे १२, पुणे १०५४, ताणेः ४४१, पालघर ३१७, मुंबई ११७, रायगड १२१५, सातारा १०३१, सांगली : ३८५० कोल्हापूरः ५०७, सिंधुदुर्ग ८३५, रत्नागिरी १३७५, नाशिकः ३३१ शाळा बंद होण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे, राष्ट्रीय शिक्षण धोरणाऐवजी राज्य सरकारने स्वतंत्र धोरण तयार करावे. शिक्षण खर्चात वाढ करावी तसेच शाळांमध्ये भौतिक सुविधा उपलब्ध करून नियमित शिक्षकांची भरती करावी असे मत शिक्षण तज्ञांनी व्यक्त केले आहे. एकीकडे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे शिक्षण, किफायतशीर करिअरच्या संधी मिळाव्यात असे नमूद करायचे पण दुसरीकडे नेमके या विरुद्ध व्यवहार करायचा, अशी सरकारची भूमिका दिसते. त्यामुळे या व्यवहाराचे दुर्गा मी परिणाम आपल्या समाज व्यवस्थेवरती होतील या शंका नाही.

**डॉ. प्रवीण बनसोड**
अमरावती,मो ९४२३४२५१२९

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

## जिल्ह्यात वाढले तब्बल नवीन ११,७०२ मतदार



**गोंदिया :-** राज्यात सध्या स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुकीचे पडघम वाजू लागले आहेत. त्यानुसार जिल्ह्यात नगर परिषद व नगर पंचायतच्या निवडणुका घेतल्या जाणार आहेत. अशात विधानसभा निवडणुकीनंतर जिल्ह्यात ११ हजार ७०२ मतदारांची वाढ झाली आहे. यातील सर्वच नव मतदारांना या निवडणुकीत मतदानाचा हक्क राहणार असे नाही. मात्र, जे निवडणूक क्षेत्रातील मतदार राहतील त्यांना मात्र उमेदवारांना गाठावे लागणार आहे, यात शंका नाही.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर आता स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुकीची तयारी सुरू झाली आहे. जिल्ह्यात गोंदिया व तिरोडा या दोन नगर परिषद, तसेच गोरेगाव व सालेकसा या दोन नगर पंचायतींची निवडणूक घेतली जाणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी स्वतंत्र मतदार यादी तयार केली जात नाही.

भारत निवडणूक आयोगाने तयार केलेली मतदार यादी वापरली जाते. त्यामुळे गेल्या विधानसभा निवडणुकीसाठी वापरली गेलेली मतदार यादी या निवडणुकीत ग्राह्य धरली जाणार आहे. त्यासोबतच, १ जुलै २०२५ पर्यंत नावे नोंदविणाऱ्या मतदारांना हक्क प्राप्त होणार आहे. त्यादृष्टीने निवडणूक आयोगानेही तयारी करण्याचे निर्देश प्रशासनाला दिले आहेत. अशातच, जिल्ह्यात विधानसभा निवडणुकीनंतर ११ हजार ७०२ मतदारांची वाढ झाली आहे. यातील सर्वच मतदार स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुकीत मतदानासाठी ग्राह्य ठरणार असे नाही.

### अशी झाली आहे मतदारसंख्येत वाढ

**गोंदिया विधानसभा क्षेत्रात विधानसभा निवडणुकीच्या वेळी ११ लाख २५ हजार १०० मतदारसंख्या होती. यामध्ये पाच लाख ५३ हजार ६८५ पुरुष, पाच लाख ७१ हजार ४०५ महिला व १० तृतीयपंथी मतदार होते, तर सध्याच्या मतदारसंख्येनुसार, एकूण मतदारसंख्या ११ लाख ३६ हजार ८०२ असून, यामध्ये पाच लाख ५८ हजार ४५२ पुरुष, पाच लाख ७८ हजार ३३८ महिला व १२ तृतीयपंथी मतदार आहेत. म्हणजेच, ११ हजार ७०२ मतदार वाढले आहेत.**

### नवमतदारांत आनंद

**स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुकीत १ जुलै २०२५ पर्यंत मतदार नोंदणी झालेल्या मतदारांना मतदान करता येणार आहे. अशात जिल्ह्यातील ११ हजार ७०२ मतदारांनाही मतदाराचा हक्क बजावता येणार असल्याने त्यांच्यात आनंद आहे.विशेष म्हणजे, नवमतदारांमध्ये तरुणांची संख्या जास्त राहत असल्याने निवडणुकीत मतदान करण्याचा त्यांच्यातच जास्त उत्साह असतो. आता १ जुलै २०२५ पर्यंतच्या नवमतदारांना मतदानाचा हक्क मिळाल्याने तरुणाईचा उत्साह वाढला आहे.**

## स्वच्छता सर्वेक्षणात गोंदिया राज्यात १९९ व्या क्रमांकावर




**गोंदिया :-** केंद्र सरकारकडून राबविण्यात येत असलेल्या स्वच्छता मोहिमेंतर्गत स्वच्छता सर्वेक्षण २०२४ मध्ये गोंदिया नगरपरिषदेने यंदा देशात २७८, वा तर राज्यात १९९ वा क्रमांक पटकाविला आहे. यंदा मोहिमेत ५० हजार ते तीन लाख लोकसंख्या गटात गोंदिया नगरपरिषदेचा सहभाग होता.

२० ते ५० हजार लोकसंख्या असलेल्या गटात तिरोडा नगरपरिषदेने राज्यात ११८ वा क्रमांक पटकाविला. देवरी नगरपंचायतीने राज्यात १६७, गोरेगाव नगरपंचायतीने १७०, सडक-अर्जुनी नगरपंचायतीने २९९, सालेकसा नगरपंचायतीने ३०५, आमगाव नगरपरिषदेने ३५२, तर अर्जुनी-मोरगाव नगरपंचायतीने ३६१ वा क्रमांक पटकाविला आहे.

स्वच्छ वातावरणातून निरोगी आरोग्यासह सकारात्मक विचारसरणी वाढते. यातूनच केंद्र शासनाने स्वच्छता अभियान सुरू केले असून, हे अभियान फक्त नगरपरिषद व शासकीय यंत्रणांपुरतेच मर्यादित राहू नये, तर त्यात नागरिकांचाही सहभाग असावा, यासाठी त्यांच्यातही स्वच्छतेबाबत भाव निर्माण केला जात आहे. यासाठी नगरपरिषदांना विविध घटक ठरवून देण्यात आले असून, त्यात नागरिकांचा सहभाग घेतला जात आहे.

यानंतर केलेल्या कामांची पावती देण्यासाठी स्वच्छता सर्वेक्षण करून शहरांना क्रमांक दिला जात आहे. यात यंदा ५० हजार ते तीन लाख लोकसंख्या असलेल्या गटात गोंदिया शहराचा समावेश करण्यात आला आहे. या स्वच्छता सर्वेक्षण-२०२४ मध्ये गोंदिया नगरपरिषदेने राज्यात १९९ वा, तर देशात २७८ वा क्रमांक पटकाविला आहे.

### असे मिळाले विविध घटकांना गुण

**एकूण १२ हजार ५०० गुण असलेल्या या सर्वेक्षणात विविध घटकांसाठी विविध गुण मर्यादा ठेवण्यात आली होती. यामध्ये गोंदिया नगरपरिषदेने गुण मिळविले असून त्याआधारे क्रमांक पटकाविला आहे.**

### घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प भोवला

**शंभर वर्षांच्या नगरपरिषदेकडे आजही घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प नसल्याने कचऱ्याची समस्या गंभीर असून यावर तोडगा म्हणून खासगी प्रकल्पासोबत करार करण्यात आला आहे. मात्र, नगरपरिषदेच्या मालकीचा प्रकल्प असल्यास ती बाब काही वेगळीच राहणार यात शंका नाही. नेमकी हीच बाब स्वच्छता सर्वेक्षणात नगरपरिषदेला दरवर्षी भोवत आली आहे.**

### घनकचरा संकलनात

**नगरपरिषदेला ७६ टक्के, कचरा वर्गीकरणात ३१ टक्के, निर्माणाधीन कचऱ्यावर प्रक्रियेत १०० टक्के, सार्वजनिक रस्ते सफाईत १०० टक्के, जलाशय स्वच्छतामध्ये १०० टक्के, तर सार्वजनिक शौचालय सफाईमध्ये २५ टक्के गुण मिळाले असून अशाप्रकारे अन्य घटकांचा समावेश आहे.**

## बांधकामाच्या नावावर टाकला मुरुम

**सालेकसा:-** स्थानिक सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत आदिवासी, नक्षलग्रस्त, अतिसंवेदनशील क्षेत्रात असलेल्या तालुक्यातील मानगड येथे रस्ता बांधकाम मंजूर करण्यात आले. त्या कामाचे कंत्राट देण्यात आले. मात्र कंत्राटदाराने बांधकामाच्या नावावर केवळ मुरुम टाकून पैशांची उचल केली असून रस्ता अपूर्णच आहे. यात मात्र सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी मौन साधले आहे.

२४६४१ मानागड ग्रामपंचायतींतर्गत आमदारांच्या प्रयत्नाने २०२३-२४ या आर्थिक वर्षात रस्ता बांधकाम मंजूर करण्यात आले होते. कंत्राटदाराने काम निकृष्ट दर्जाचे करून लाखो रुपयांचा निधी घशात घातला. कामात निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरून कोणत्याच मशीनद्वारे काम केले नाही. सदर रस्ता मानागड धरणापासून रामाटोलापर्यंत अंदाजे ३०० मीटर लांब आणि रुंदी ३ मीटर आहे. रस्ता बांधकाम करताना काही ठिकाणी मुरुम टाकला तर काही ठिकाणी तोदेखील टाकला नाही. त्यामुळे गिट्टी बाहेर निघाली आहे. हा सर्व कारभार अधिकाऱ्यांच्या व कंत्राटदाराच्या संगनमताने होत असल्याची ओरड सुरू आहे. या कामाकरिता शासनाने २५ लाख रुपयांचा निधी मंजूर केला. कंत्राटदाराला यासंदर्भात विचारणा केली असता तो कसलीही माहिती देण्यास तयार नाही. हे काम कोणत्या एजन्सीला आहे, याचीदखील ग्रामपंचायत प्रशासनाला माहिती नाही. मानागड रस्त्याच्या कामाची उच्चस्तरीय चौकशी करून संबंधित अधिकारी व कंत्राटदारांवर तत्काळ कारवाई करण्याची मागणी ग्रामपंचायत आणि ग्रामस्थांच्यावतीने करण्यात आली. या कामावर शासनाकडून उत्खननाची परवानगी घेण्यात आली नसल्याचा आरोपही होत आहे.

## एनएमडी कॉलेजच्या बाजूचा नाल्यावरील पूल खचला



**गोंदिया :-** जिल्ह्यात सुरु असलेल्या मुसळधार पावसाने जनजीवन अस्तव्यस्त झाले आहे. त्यातच पावसामुळे शहरातील एन. एम. डी. महाविद्यालयाच्या बाजूला असलेल्या नाल्यावरील पूल खचला. ही घटना शनिवारी (ता. २६) रोजी दुपारच्या सुमारास घडली.

नटवरलाल माणिकलाल दलाल कॉलेजच्या समोरील रस्त्यावर दिवस-रात्र दुचाकी, चारचाकी व जड वाहनांची ये-जा सुरु असते. तसेच नमाद महाविद्यालय आणि डी. बी. सायंस महाविद्यालयांच्या विदयार्थ्यांची, प्राध्यापक, कर्मचाऱ्यांची ही संख्या मोठ्या प्रमाणात असते. त्यामुळे हा रस्ता वदर्ळीचा असते. मात्र, आज नाल्यावरील पूल अचानक खचल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. दरम्यान, वाहतूक विभागाच्या वतीने नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने बॅरिकेट्स लावण्यात आले. नागरिकांनी नाल्यावरून सावध राहून ये - जा करावे, असे आवाहन वाहतूक विभागाच्या वतीने करण्यात आले आहे. संबंधित विभागाने याकडे लक्ष घालून नाल्यावरील खचलेल्या पुलाची लवकरात लवकर दुरुस्ती करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

## शाळा बंद करण्याच्या निर्णयाचा शिक्षण बचाव समितीने नोंदविला निषेध




**गोंदिया :-** पटसंख्येच्या निकषावरून जिल्हा परिषदेच्या १८ हजार शाळा बंद करण्यासंदर्भातील राज्य सरकारच्या निर्णयाचा जिल्ह्यातील शिक्षण बचाव समन्वय समितीतर्फे शुक्रवारी (दि.२५) जिल्हाभरात निदर्शने करून निषेध नोंदविला. तसेच कमी पटसंख्येच्या शाळा बंद करू नका, अशी मागणी शिष्टमंडळाच्या वतीने मुख्यमंत्री व शिक्षणमंत्र्यांच्या नावे निवेदन उपविभागीय अधिकाऱ्यांना देण्यात आले.समितीचे जिल्हा समन्वयक अतुल सतदेवे, वसंत गवळी, सी. पी. बिसेन, यशवंत रामटेके, रमेश बिसेन, सुनील भोंगाडे, कुंदा चंद्रिकापुरे, विजया ओझा, अरुणा उसरबरसे, सोनू पारधी, जया कुमार, राखी भारद्वाज, किरण पारधी, ॲड. नरेश शेंडे, सुरेश बन्सोड, सरपंच अजित ठवरे, विलास मेश्राम, लंकेश जनबंधू आदींचा समावेश होता

यावेळी दिलेल्या निवेदनातून शासकीय शाळा बंद करण्याचा निर्णय त्वरित रद्द करा, शिक्षण-क्षेत्रात शासकीय गुंतवणूक वाढवा, शासकीय शाळांना अनुदान द्या, त्यांची बदनामी थांबवा, हिंदी भाषेची सक्ती करू नका, मराठी भाषेचे संवर्धन करा, प्रत्येकाला सक्तीचे, मोफत व दर्जेदार शिक्षण मिळाले पाहिजे, शिक्षणाचे खासगीकरण आणि व्यापारीकरण थांबविण्यात यावे. भारतीय संविधानाच्या कलम २१ व २१-अ नुसार शिक्षणाला मूलभूत हक्क मानले गेले आहे. भारतातील मुलांना सक्तीचे व मोफत शिक्षण देणे ही सरकारची महत्त्वाची जबाबदारी आहे. शिक्षण हक्क कायद्यानुसार ६ ते १४ वयोगटातील मुलांना सक्तीचे व मोफत शिक्षण देणे, ही सरकारची महत्त्वाची जबाबदारी आहे. तसेच भारतातील प्रत्येक बालकास प्राथमिक शाळा त्याच्या घरापासून १ किलोमीटरच्या आत, उच्च प्राथमिक शाळा ३ किलोमीटरच्या आत व माध्यमिक शाळा ५ किलोमीटरच्या आत उपलब्ध करून देणे, हे शासनाचे कर्तव्य आहे. त्यामुळे या शाळा बंद करू नये, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.

तिरोड़ा तहसीलदार यांना निवेदन सादर करत असताना प्रामुख्याने एडवोकेट नरेश शेंडे,सुरेश बंसोड, सरपंच अजित ठवरे,माजी नगरसेवक भोंदेकर, विलास मेश्राम, रिंकू टेम्भेकर, लंकेश जनबंधु आदि आणि मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.

## दहेगाव-चिरचाळबांध-शिवणी-किडंगीपार रस्त्याची अवजड वाहतुकीने दुरवस्था



**आमगाव :-** तालुक्यातील चिरचाळबांध परिसरात अनेक क्रशर व डांबर प्लांट सुरु आहे. चिरचाळबांध पंचोल मुख्य चौकातून गौण खनिजाचे ४०.५० टन क्षमतेचे दररोज दीडशे ते दोनशे ट्रकची वाहतूक होते. परिणामी या रस्त्यांची पूर्णपणे दुरवस्था झाली आहे. या रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडले असून त्यात पावसाळ्यात पाणी साचून खड्डे तयार झाले. परिणामी या मार्गावरुन ये-जा करणारे विद्यार्थी आणि गावकऱ्यांना याचा फटका बसत आहे. त्यामुळे या रस्त्याची दुरुस्ती करण्याची मागणी जि.प. सदस्य हनुवत वट्टी यांनी जिल्हाधिकारी प्रजित नायर यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

या रस्त्याचे बांधकाम करण्यात यावे यासाठी मागील चार वर्षापासून सतत पाठपुरावा करण्यात येत आहे. परंतु अद्यापही संबंधित विभागाने याची दखल घेऊन या रस्त्याची दुरुस्ती केली नाही. परिणामी विद्यार्थी आणि गावकऱ्यांची समस्या कायम आहे. दहेगाव-खुशिपार-चिरचाळबांध या रस्त्याचे श्रेणी वर्धन होऊन प्रजिमा ४५ व भजेपार-नवेगाव-किकरीपार रस्ता, इजिमा-४६, सा.क्र. ७/०० ते १२/५०० रस्ता बांधकाम व सिलेपार बुराडीटोला चिरचाळबांध-शिवणी किडंगीपार रस्ता दुरुस्ती करण्याचे निर्देश संबंधित विभागाला त्वरित देण्यात यावे, अशी मागणी यावेळी जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आली. अन्यथा या विरोधात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. यामुळे निर्माण होणाऱ्या परिस्थितीला जिल्हा प्रशासन जबाबदार राहील असा इशारा यावेळी दिलेल्या निवेदनातून दिला.

जिप अध्यक्ष लायकराम भेंडारकर, उपाध्यक्ष सुरेश हर्षे, आमगाव पंसचे सभापती राजेन्द्र गौतम, जिप सदस्य हनवंत वट्टी, चिरचाळबांधचे उपसरपंच सुधीर पटले, खुर्शिपारच्या सरपंच चव्हान, बुराडीटोलाच्या सरपंच रिनाईत, सितेपारचे सरपंच बिसेन, पियुष, केवल भाजीपाले आदिंनी जिल्हाधिकारी प्रजित नायर यांची भेट घेत त्यांना रस्त्याच्या दुरवस्थेबद्दल अवगत केले. रस्त्याचे बांधकाम सीएसआर निधीतून करण्याची मागणी केली. यावर नायर यांनी सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन दिले.

## आयुष्मान आरोग्य केंद्र मुंडीपारला सीईओ एम.मुरुगानथंम यांची भेट



**गोरेगाव:-** तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र चोपा अंतर्गत आयुष्मान आरोग्य मंदीर मुंडीपार येथे २५ जुलै रोजी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुरुगानथंम यांनी आकस्मिक भेट दिली. दरम्यान आरोग्य संस्थेत देत असलेल्या आरोग्य सेवा व सुविधाची पाहणी केली. गरोदर माता व बालकांशी संवाद साधून रुग्णसेवेबद्दल माहिती जाणून घेतली.

मुकाअ मुरुगानंथम यांनी मुंडीपार केंद्रात भेट देवून आरोग्य सेवाविषयी आढावा घेतला. आरोग्य संस्थेतील समुदाय आरोग्य अधिकारी मनिष कटरे यांचे मार्फत सुरु असलेली ओपीडी, हिमोग्लोबीन रक्त तपासणी करुन त्या मशीन बाबत माहीती जाणुन घेतली. आरोग्य सेविका अर्चना बोरकर यांचेशी कार्यक्षेत्रात देत असलेले नियमित लसीकरणाविषयी माहिती घेवून नोंद वहीची पाहणी केली. गावातील बालकाला भेट देवून लसीकरण कार्डची पाहणी केली. यावेळी कुठलाही बालक लसीकरणापासून राहणार नाही, ह्यादृष्टीने नियोजन करण्याचे सुचना दिल्यात.

आरोग्य सेविका मिना मळकाम यांचेशी गरोदर मातेला देत असलेल्या सेवा विषयी माहिती घेत गावातील गरोदर मातेला भेट देवुन संवाद साधला. तसेच देत असलेल्या आरोग्य सेवेची पडताळणी केली. आरोग्य सेवक अभिजीत तावाडे यांचेशी कार्यक्षेत्रातील घेतलेल्या रक्त नमुने, निघालेल्या हिवताप दुषित रुग्ण व कंटेनर सर्वेक्षणची माहीती जाणून घेत गोळा केलेले रक्त नमुने रजिष्टरची पाहणी करून दर महिन्याला कार्यक्षेत्रात गृहभेटी करुन कमीत कमी १०० रक्तनमुने घेण्याच्या सुचना दिल्या. याप्रसंगी मुंडीपार क्र. १ अंगणवाडी येथे भेट देवुन कार्यक्षेत्रात असलेल्या सैम व मॅम बालक, आहाराबाबत चौकशी केली. एकंदरीत शेवटी पावसाळ्यात साथरोग उद्भवणार नाही, ह्यादृष्टीने प्रतिबंधात्मक उपाययोजना व दैनंदिन गृहेटि सर्वेक्षण करण्याच्या सुचना दिल्यात.

## एम.जी.पॅरामेडिकल कॉलेजच्या विद्यार्थ्यांना ओ.टी.टेक्निशियन परीक्षेमध्ये घवघवीत यश



**गोंदिया :-** महाराष्ट्र राज्य कौशल्य व्यवसायिक शिक्षण आणि प्रशिक्षण मंडळ, मुंबई अंतर्गत घेण्यात येणाऱ्या ओ.टी. टेक्निशीयन या एक वर्षीय अभ्यासक्रमाच्या परिक्षेचा निकाल १६ जुलैला लागला असुन या मध्ये एम. जी. पॅरामेडिकल कॉलेज मुर्री चौकी, गोंदियाच्या १०० टक्के निकाल लागलेला आहे. जुन २०२५ मध्ये झालेल्या परिक्षेमध्ये सहभागी विद्यार्थ्यांपैकी कु. ईशा नेवारे या विद्यार्थीनीने ८७.००टक्के गुण घेऊन प्रथम क्रमांक पटकावीला आहे.त्याच्यां पाठोपाठ अंकुश बावनथळे ८६.०० टक्के, कु. चेतना मेहर ८५.५७टक्के, कु. स्वाती राणा ८५.००टक्के, कु. मिनाक्षी राऊत ८५.००टक्के, गुण घेऊन यश संपादन केलेला आहे.

जिल्ह्यात पॅरामेडिकल क्षेत्रात अग्रणी असलेल्या एम. जी. पॅरामेडिकल कॉलेजला महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई व महाराष्ट्र राज्य कौशल्य व्यवसायिक शिक्षण आणि प्रशिक्षण मंडळ, मुंबईची मान्यता असुन दरवर्षी अनेक विद्यार्थी शासकीय नौकरी साठी निवडले जातात. विद्यार्थ्यांनी आपले यशाचे श्रेय कॉलेजचे संचालक अनील गोंडाणे व पालकांना दिले आहे. या यशासाठी प्राचार्य अनुसया लिल्हारे, प्रा. प्रीती वैद्य, प्रा. रामेश्वरी पटले प्रा. छाया राणा, प्रा. आरती राऊत, प्रा. ललीतकुमार डबले, प्रा. मनीष चौधरी, प्रा. सौरभ बघेले, प्रा. आकाश श्रोते, प्रा. सम्येक गणवीर, राजु रहांगडाले, राजा उंदिरवाडे, योगेश्वरी ठवरे, व रूपाली धमगाये यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून पुढिल वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## पांगोली नदीवरील जीर्ण पुलाचे काम दहा दिवसात सुरू करा अन्यथा आंदोलन छेडणार



**गोंदिया :-** शहरातील भीमघाट पांगोली नदीवरील जीर्ण व धोकादायक पुलाच्या दुरुस्तीच्या मागणीसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेना २०२१ पासून सातत्याने पाठपुरावा करीत आहे. मात्र, प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप आहे. या पुलावरून शेकडो नागरिक ये-जा करतात. मात्र तुटलेली रेलिंग, खड्डेयुक्त रस्ता रात्रीच्या अपुऱ्या व प्रकाशव्यवस्थेमुळे अपघाताची शक्यता बळावली आहे. विद्यार्थी, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना याचा त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे दहा दिवसात पुलाच्या बांधकाम प्रक्रियेला सुरुवात करावी अन्यथा आंदोलन छेडण्याचा इशारा मनसेने सार्वजनिक बांधकाम विभागाला दिला आहे.

मनसेने अनेक निवेदनांनंतर मंगळवारी (दि. २२) थेट सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता रामटेके यांच्याशी चर्चा करून पुलाचे तातडीने नूतनीकरण, तुटलेली रेलिंग बदलणे, खड्डे भरणे, रात्रीच्या सुरक्षेसाठी रेडियम पट्ट्या लावणे आणि सूचनाफलक बसवण्याची मागणी केली आहे. बांधकाम विभागाने यावर सकारात्मक प्रतिसाद देत १० दिवसांत काम पूर्ण करण्याचे आश्वासन दिले आहे. जर १० दिवसांत काम पूर्ण झाले नाही तर १ ऑगस्ट रोजी रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. तसेच यामुळे निर्माण होणाऱ्या परिस्थितीला बांधकाम विभाग व शासन जबाबदार राहील, असा इशारा मनसेने दिला आहे.मनसेचे शहर अध्यक्ष सुरेश चौधरी, माजी शहर संघटक क्षितिज वैद्य, शहर उपाध्यक्ष सुमित कावळे, डिलेश उके, सोनू बावनथळे, शहर महासचिव माधव बनकर, छोटा गोंदिया शाखा अध्यक्ष कार्तिक राऊत, उपशाखा अध्यक्ष शुभम सहारे, दिनेश नेरकर, विकास बनकर, टोनेश बनकर, आयुष फुंडे, अनिकेत बुरडे यांच्यासह अनेक मनसैनिक उपस्थित होते.

## प्रगत विचारांचा आदर्श: यशपाल कऱ्हाडे यांचा घेतला देहदानाचा संकल्प



**भंडारा: -** घरात असलेला सामाजिक कार्याचा वारसा पुढे नेत प्रगतशील विचारसरणीचे प्रतिनिधित्व करणारे यशपाल कऱ्हाडे यांनी मृत्यूनंतर देहदान करण्याचा संकल्प केला. जे. एम. पटेल महाविद्यालय, भंडारा येथे कार्यरत असलेले यशपाल कऱ्हाडे हे विविध सामाजिक संस्थांमध्ये सक्रीय सहभाग घेऊन समाजहितासाठी कार्यरत आहेत. देहदानासारख्या निर्णयातून समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन आणि मानवतेचे मूल्य रुजवण्याचा त्यांचा प्रयत्नांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

या निर्णयानंतर यशपाल कऱ्हाडे म्हणाले की, आज समाजात अनेक लोक एखादा अवयव मिळाल्यास अनेक वर्ष जगू शकतात मात्र त्यांना अवयव मिळत नाहीत. अजूनही समाजात देहदानाबद्दल गैरसमजुती आहेत. या गैरसमजुती दूर झाल्या पाहिजेत आणि खऱ्या अर्थाने आपण विज्ञानवादी आहोत, हे केवळ बोलून नव्हे तर कृतीतून दाखवणे गरजेचे आहे. आजही आपण बघतो की वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विदयार्थ्यांना अभ्यास करण्याकरिता बॉडीची गरज भासते, याही बाबीचा विचार करून द शेड्युल कास्ट अँड बुद्धीस्ट पेन्शनर्स असोसिएशन नागपूर या संस्थेतर्गत देहादनाचा संकल्प केला. हे सर्व करत असताना पत्नी सोनाली आणि संपूर्ण परिवार यांना विश्वासात घेऊन हा निर्णय घेतला. माझ्या संपूर्ण आयुष्यात त्यांची साथ महत्वाची आहे आणि ती कायम मिळत राहिली आहे. त्यामुळे मी हे पाऊल उचलले आहे. माझ्या आईचे निधन झाल्यानंतरही आम्ही रूढी परंपरांना फाटा देत केवळ मुलांच्या हातून नव्हे तर मुलींच्या हातूनही आमच्या आईच्या मृतदेहाला मुखाग्नी दिला होता, असेही ते म्हणाले.

**परंपरागत गोष्टी केवळ करायच्या म्हणून न करता समाजाच्या भविष्याचा विचार करणे आवश्यक आहे, असे मला वाटते. ज्या समाजात आपण जन्मलो त्या समाजाला आपण काय देऊ शकतो याचा विचार आपण कायमच केला पाहिजे. जीवन जगत असतानाही आणि मृत्यूनंतरही ही भावना जिवंत असावी. आणि मृत्यूनंतर आपला देह उपयोगी पडत असेल, एखाद्या अवयवामुळे कुणाच्या तरी जीनात आनंद येणार असेल तर यापेक्षा मोठं योगदान दुसरं असू शकतं नाही. त्यामुळे एक चांगला सामाजिक वारसा जपत आणि तथागत भगवान गौतम बुद्धांचे विज्ञानवादी तत्वज्ञान पुढे नेत हा निर्णय घेतला.**

**- यशपाल कऱ्हाडे**

### कोण आहेत यशपाल कऱ्हाडे?

यशपाल कऱ्हाडे मूळचे चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रह्मपुरी तालुक्यातील रहिवासी आहेत. मात्र नोकरीच्या निमित्ताने ते भंडारा जिल्ह्याती साकोली येथे स्थायिक झाले. गोंदिया शिक्षण संस्थेद्वारे संचालित जे. एम. पटेल महाविद्यालयात ते प्रशासकीय कर्मचारी म्हणून कार्यरत आहेत. व्यावसायिक जबाबदारी पूर्ण करत असतानाच विविध सामाजिक संस्थांच्या माध्यमातून ते समाजकार्यातही सक्रिय आहेत. आपल्या महाविद्यालयीन जीवनापासून ते ओबीसी चळवळीसोबत सक्रीयपणे काम करत आहेत. तसेच उत्तम बॅडमिंटनपटू, नियमित विपश्याना साधक आणि जलतरणपटू असलेले यशपाल कऱ्हाडे युवकांना सामाजिक बांधिलकीची जाणीव व्हावी, सकारात्मक परिवर्तनाची दिशा मिळावी, या उद्देशाने विविध उपक्रमांत सहभागी होत असतात.

## पंचायत समितीत विकासकामांचा आढावा



**गोरेगाव:-** पंचायत समितीच्या सभागृहात तालुक्यातील विविध विकास कामांचा सखोल आढावा घेण्यासाठी बैठक पार पडली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी तिरोडा गोरेगाव विधानसभा क्षेत्राचे आ. विजय रहांगडाले यांनी होते.

बैठकीला गोंदिया जिल्हा परिषदेचे अर्थ व बांधकाम सभापती डॉ. लक्ष्मण भगत, माजी जि. प. अध्यक्ष पंकज रहांगडाले, पंचायत समिती सभापती चित्रलेखा चौधरी, उपसभापती रामेश्वर महारवाडे, माजी उपसभापती राजकुमार यादव, शैलेश नंदेश्वर, जितेंद्र कटरे यांच्यासह विविध शासकीय अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत गोरेगाव तालुक्यात सुरू असलेल्या व आगामी प्रस्तावित रस्ते, विकास योजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यामध्ये विशेषतः ग्रामीण पाणीपुरवठा योजना, शिक्षण सुविधा आणि प्राथमिक आरोग्य सेवा या महत्त्वाच्या मुद्यांवर भर देण्यात आला.

आ. विजय रहांगडाले यांनी अधिकाऱ्यांना स्पष्ट निर्देश दिले की, मविकास कामे दर्जेदार असली पाहिजेत आणि ठरलेल्या वेळेत पूर्ण व्हावीत, अन्यथा जबाबदारी निश्चित केली जाईल. तसेच, नागरिकांच्या अपेक्षा लक्षात घेता सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वय राखून काम करावे, अशी कडक सूचना त्यांनी दिली.

तालुक्यातील ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करणे, विकासाच्या योजनांमध्ये पारदर्शकता आणि गती आणणे हे या बैठकीचे मुख्य उद्दिष्ट होते. बैठकीत उपस्थित पदाधिकाऱ्यांनीही सूचना आणि समस्या व अडचणी यावेळी मांडल्या.

# निर्वाह आणि भोजन भत्ता मागील चार महिन्यांपासून रखडला

### नागपूर विभागातील ओबीसी वसतिगृह विद्यार्थी संख्या

| जिल्हा | मुली | मुले |
|---|---|---|
| नागपूर | ६५ | ८४ |
| वर्धा | ५३ | ७० |
| भंडारा | ८९ | ५० |
| गोंदिया | ५२ | ४९ |
| चंद्रपूर | ४५ | ४४ |
| गडचिरोली | ८० | ५० |

**गोंदियाः–** जिल्ह्यासह राज्यातील ओबीसी वसतीगृहातील विद्यार्थ्यांचा निर्वाह आणि भोजन भत्ता मागील चार महिन्यांपासून रखडल्याने विद्यार्थी व विद्यार्थीनींना विविध समस्यांना सामोरे जाण्याची वेळ सरकारच्या आडमुठे धोरणामुळे आली आहे.

गोंदियासह राज्यातील ५८ शासकीय ओबीसी वसतिगृहांत ४ हजार ६० विद्यार्थी, विद्यार्थिनी वास्तव्यास आहेत. मागील वर्षी सप्टेंबर महिन्यात वसतीगृह सुरू करण्यात आले.




**ओबीसी, व्हीजेएनटी आणि एसबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी निर्वाह आणि भोजन भत्ता मंजूर झाला आहे. निधी संबंधित विभागाकडे हस्तांतरीत झाल्यानंतर रक्कम विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर डीबीटी होईल.**

**– विजय वाकूडकर,संचालक,ओबीसी बहुजन कल्याण विभाग नागपूर**

वसतिगृहांत खानावळी (मेस) नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांना भोजनासाठी ४५०० रुपये व निर्वाह भत्ता ६०० रुपये तर विद्यार्थिनींना ८०० रुपये देण्याचा निर्णय शासनाने घेतला. ही रक्कम डीबीटीद्वारे विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर दर महिन्याला जमा होणे अपेक्षित आहे. मात्र महिनोमहिने रक्कम जमा करण्यात येत नाही.

**राज्याचे अर्थमंत्री अजित पवार यांनी निधी वाटप करताना ओबीसींच्या महाज्योती संस्था व मंत्रालयाशी भेदभाव केला. सारथीला अधिक निधी दिला. ऱाज्यातील सरकार ओबीसींवर अन्याय करीत आहे. विरोधकही गप्प आहेत. ओबीसींचा वालीच राहिलेला नाही. आता ओबीसींनाच त्यांच्या न्याय्य हक्कासाठी लढा द्यावा लागेल. ओबीसींवरील अन्याय खपवून घेतला जाणार नाही. शासनाने तातडीने ओबीसी विद्यार्थ्यांचा रखडलेला निर्वाह आणि भोजन भत्ता त्यांच्या खात्यात जमा करावा, अन्यथा आंदोलन करू.**

**खेमेंद्र कटरे,संयोजक ओबीसी विचार मंच गोंदिया.**

**मागील चार महिन्यांपासून भत्याची रक्कम जमा झाली नाही. खाना–वळवाले पैस्याची मागणी करीत आहेत. शिवाय दैनिक गरजेसाठी पैशाची आवश्यकता आहे, शासनाने रक्कम तत्काळ द्यावी.**

**– भरत भेलावे,विद्यार्थी, ओबीसी वसतीगृह गोंदिया.**

मार्च ते आजपर्यंत ओबीसी वसतिगृहातील विद्यार्थी, विद्यार्थिनी भोजन व निर्वाह भत्याच्या प्रतीक्षेत आहेत. यामुळे विद्यार्थ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. आर्थिक विवंचनेमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक आणि दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. विद्यार्थ्यांना वेळेवर भोजन आणि इतर आवश्यक गरजा पूर्ण करणे कठीण झाले आहे. त्यामुळे, शासनाने या गंभीर विषयाकडे लक्ष देऊन त्वरीत कार्यवाही करावी, अशी मागणी विद्यार्थी आणि पालकांकडून होत आहे.

# जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांची गोठणगाव आरोग्य केंद्राला भेट

**गोंदिया :–** जिल्हा आर–ोग्य अधिकारी डॉ. अभिजीत गोल्हार यांनी अर्जुनी–मोरगाव तालुक्यातील अतिदुर्गम आणि जंगलव्याप्त ग्राम गोठणगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला रविवारी (दि. २०) आकस्मिक भेट देऊन कामकाजाची पाहणी केली. यावेळी त्यांच्यासोबत जिल्हा साथरोग अधिकारी डॉ. निरंजन अग्रवाल देखील उपस्थित होते.



या भेटीदरम्यान प्राथमिक आरोग्य केंद्र, गोठणगाव येथील प्रसूतीगृह, प्रयोगशाळा, आंतररुग्ण वॉर्ड, औषधसाठा, लस साठवणूक केंद्र यांची पाहणी करून लोकांना चांगल्या आरोग्य सुविधा देण्याच्या दृष्टिकोनातून सुधारणा करण्यासाठी वैद्यकीय अधिकाऱ्यांना सूचना केल्या. यात प्रामुख्याने प्राथमिक आरोग्य केंद्राच्या आतील व बाहेरील परिसराची स्वच्छता नियमि तपणे करणे, प्रसूतीगृहाला भेट देऊन विविध ट्रेची तपासणी करणे याबाबींचा समावेश होता. तसेच कुपोषित अंगणवाडीतील बालकांची तपासणी करून कुपोषित बालकांचे श्रेणीनुसार वर्गीकरण करावे आणि आवश्यक असल्यास अर्जुनी–मोरगाव येथील एन.आर.सी. केंद्रावर भरती करण्याच्या सूचना देण्यात आल्या. गरोदर मातेला प्रसूतीपूर्व व प्रसूतीनंतर नियमित सेवा पुरवणे आवश्यक आहे. आश्रमशाळेतील मुलांची आरडीके किटने मलेरिया बाबत तपासणी करावी. अंगणवाडीतील बालकांची नियमित तपासणी करावी आणि आरोग्यविषयक जनजागृती साहित्य लोकांना दिसेल, अशा ठिकाणी प्रदर्शित करावे, अशा विविध सूचनाही देण्यात आल्या. या भेटीवेळी प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी डॉ. स्नेहल गायकवाड, आरोग्य सहायक सुरेश पारधी, आरोग्य सेविका प्रमिला रॉय, परिचर कुमुद शहारे, डेटा एंट्री ऑपरेटर फुलिचंद चौधरी तसेच वाहनचालक खेडीकर उपस्थित होते.

## मुंडीपार शाळेला सभापती भगत यांची भेट



**गोरेगाव :–** तालुक्यातील ग्राम मुंडीपार येथे शनिवारी (दि. २६) अति पावसामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीची पाहणी करण्यासाठी जिल्हा परिषद अर्थ व बांधकाम सभापती डॉ. लक्ष्मण भगत यांनी भेट दिली. या दौऱ्यात त्यांनी अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची माहिती घेतली व गावातील नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.

भेटीत त्यांनी जिल्हा परिषद शाळेत जाऊन जुन्या व जीर्ण इमारतीची पाहणी करीत सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करण्याचे संकेत दिले. यावेळी उपसरपंच जा–वेद खान, मुख्याध्यापक शहारे, तंटामुक्त समिती सदस्य संजू रहांगडाले, ग्रामपंचायत लिपिक सुनील वाघाडे, ऑपरेटर रोहित पांडे, अजय नेवारे, राहुल राऊत, राजू भोयर तसेच गावातील अनेक नागरिक उपस्थित होते. डॉ. भगत यांनी प्रशासनाला शक्य तेवढ्या लवकर मदत पोहोचवण्याचे निर्देश दिले असून, नागरिकांनी संयम बाळगावा व प्रशासनाशी सहकार्य करावे, असे आवाहनही केले.

# २७ हजार महिला 'लाडकी बहीण योजनेत' अपात्र

**गोंदियाः–** राज्यातील महायुती सरकारने विधानसभा निवडणुकीपूर्वी महिला मतदारांना खुश करण्यासाठी मलाडकी बहीण योजनाफ अस्तित्वात आणली. सुरुवातीच्या काळात सरसकट लाभ देण्यात आला. आता मात्र हीच योजना सरकारसाठी आर्थिक डोकेदुखी वाढविणारी ठरल्याने आता लाभ घेणाऱ्या महिलांची झाडाझडती सुरू आहे. तपासणीदरम्यान जिल्ह्यात तब्बल २६ हजार ९२७ महिला अपात्र असल्याचे आढळून आल्याने त्यांना दिला जाणारा लाभ थांबविण्यात आला.




योजनेंतर्गत महिलांना दीड हजार रुपयांचा लाभ देण्याचा निर्णय शासनाने घेतल्यानंतर जिल्ह्यात त्याला उत्कृष्ट प्रतिसाद मिळाला. यादरम्यान बोगस लाभार्थ्यांनी योजनेत सहभागी होत पैसा लाटल्याचा आर–ोप झाल्यानंतर शासनाने अशा महिलांचा शोध सुरू करताच जिल्ह्यातील सुमारे २६ हजार ९२७ महिलांनी लाभ सोडला. आता या योजनेची नोंदणीही बंद झाली. नोंदणी बंद होऊन ९ महिन्यांपेक्षा अधिक कालावधी लोटला. यादरम्यान काही महिला वंचित आहेत. जिल्ह्यातील ३ लाख ३७ हजार ५०७ महिलांना मार्च महिन्याचा हप्ता मिळाला. परंतु एप्रिल महिन्याचा हप्ता मिळाला नाही. जिल्ह्यात लाडकी बहीण योजनेचे ३ लाख ३७ हजार ५०७ लाभार्थी आहेत. आगामी हप्त्यानंतर ही संख्या कमी होण्याची शक्यता आहे. कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न २.५० लाखांपेक्षा अधिक किंवा कुटुंबात आयकर दाता सदस्य असेल, तर कुटुंबातील सदस्य नियमित,कायम कर्मचारी, कंत्राटी कर्मचारी म्हणून सरकारी विभाग अथवा राज्य सरकारच्या स्थानिक संस्थेमध्ये कार्यरत असेल तर अर्ज बाद होईल. कुटुंबातील सदस्यांच्या नावावर चारचाकी वाहने (ट्रॅक्टर वगळून) असेल तरीही अर्ज रद्द केला जात आहे. त्यामुळे खोट्या कागदपत्रांद्वारे लाभ घेणाऱ्या महिलांचे धाबे दणाणले आहे.

**ज्यावेळी लाडकी बहीण योजनेचे अर्ज दाखल झाले, त्याचवेळी इतर योजनांमधून पैसे मिळत असतील तर लाडकी बहीण योजनेतून ते वजा केले जातील, अशी सूचना आली आहे. त्यामुळे त्यासंदर्भात इतर आदेश येण्याची गरज नाही.अशा महिलांनी अन–दान नाकारले आहे. याशिवाय आता नवीन महिलांची नोंदणी बंद करण्यात आली.**

**– कीर्तीकुमार कटरे, महिला व बालविकास अधिकारी, गोंदिया**

## विद्यार्थ्यांचा चिखलातून प्रवास, नागरिकांत रोष

**तिरोडा :–** शहरात मागील सहा महिन्यांपासून भूमीगत गटार योजनेची कामे केली जात आहे. शहरातील नेहरू वार्ड येथे योजनेच्या कामाकाजामुळे ढिसाळ रस्त्याची दुरावस्था झाली असून सर्वत्र चिखल, खड्डे, उखडलेले रस्ते दिसून येत आहे. नागरिकांसह शालेय विद्यार्थ्यांसाठी ये–जा करण्यास तारेवरची कसरत करावी लागत असल्याने नागरिकांकडून चांगलात संपात व्यक्केला जात आहे.



जवळपास सहा महिन्यांपूर्वीपासून शहरात गटार योजनेची कामे सुरू आहेत. रस्त्याच्या मधोमध खोदकाम करून पाइप व चेंबर टाकण्यात आले तसेच रस्त्याच्या हलगर्जी–पणा करण्यात आला पुनर्बांधणीत आहे. खोदकामानंतर त्या ठिकाणी माती अथवा मुरूम टाकून रोलरने समपातळी करणे गरजेचे होते. मात्र, कंपनीने ते टाळले. परिणामी, संपूर्ण तिरोडा शहरात रस्ते खड्ड्यांनी भरले असून, नागरिकांना चालणे, वाहने चालवणे मुश्कील झाले आहे. चिखल, खड्डे आणि उखडलेले रस्ते यामुळे नागरिकांचे हाल होत आहेत. उल्लेखनीय असे पावसामुळे खोदलेल्या जागी मोठे खड्डे पडत असून त्या ठिकाणी वाहने सुद्धा अडकू ला–गले आहे. परिणामी नागरिकांना अपघाताला समोर जावून किरकोळ जखमी सुद्धा व्हावे लागत आहे. नगर पालिका समितीने रस्त्यांच्या दुरवस्थेवर तातडीने उपाययोजना करावी, अशी मागणी नेहरू वॉर्डतील नागरिकांनी केली आहे.

## तरूणाजवळील काळ्या बॅगेतून दोन पिस्तुलं व १० जिवंत काडतुसे जप्त

**गोंदिया :–** स्थानिक गुन्हे शाखेच्या तडाखेबंद कारवाईत एक संशयित तरुण पोलिसांच्या जाळ्यात सापडला असून, त्याच्याकडून दोन गावठी पिस्तुलं व १० जिवंत काडतुस जप्त करण्यात आले आहेत. हा तरुण गोंदिया येथून बालाघाटकडे अवैध शस्त्रे घेऊन जात असल्याची गुप्त माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळाल्यानंतर ही कारवाई २७ जुलै करण्यात आली.स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस पथक नियमित गस्त घालीत असताना त्यांना एका गोपनीय बातमीदाराकडून मि ळालेल्या माहिती प्रमाणे एक व्यक्ती मोटारसायकलवरून अवैध अग्निशस्त्रे घेऊन बालाघाटकडे जात आहे. माहितीची खातरजमा करून पोलिसांनी त्वरीत गोंदिया–बालाघाट रोड येथील मुरपार गावाजवळ नाकाबंदी लावली. रात्री ८:३०



वाजता एक तरूण काळ्या बॅगसह मोटारसायकलवरून संशयास्पद हालचाली करताना पोलिसांच्या नजरेस पडला. त्याला थांबवून विच–ारपूस केली असता त्याने आपले नाव प्रशांत केशव सोनवणे (१८ ) रा. बारो, ता. कोपरगाव, जि.अहिल्यानगर असे सांगितले. त्याची बॅग तपासून एक पिस्तुल लोखंडी, १६ सेमी बॅरल व १० सेमी मूठ किंमत ५० हजार, दुसरी पिस्तुल लोखंडी, १५ सेमी बॅरल व ८.५ सेमी मूठ किंमत ५० हजार, काडतुसे १० नग किंमत ५ हजार असा १ लाख ५ हजाराचे अवैध शस्त्र जप्त केले. या प्रकरणी रावणवाडी पोलिसात भारतीय हत्यार कायदा कलम ३, २५ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. तपास पोलीस करीत आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक गोरख भामरे यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पुरुषोत्तम अहेरकर यांच्या नेतृत्वात पोलीस हवालदार राजेंद्र मिश्रा, महेश मेहर, संजय चौहान, सोमेन्द्रसिंह तुरकर, छगन विठ्ठले, राकेश इंदुरकर, योगेश रहिले, लक्ष्म ण बंजार यांनी केली आहे.

# दोन तालुक्यांना मिळणार १ हजार हेक्टर वनजमीन

**गोंदिया :–** जिल्हा प्रशासनाने वन हक्क कायद्यांतर्गत जिल्ह्यातील २ तालुक्यांतील १०१ गावांना १ हजार हेक्टर वनजमीन देण्यास आठ दिवसांपूर्वीच मान्यता दिली. या वनजमिनीमुळे केवळ गावांचे चित्रच बदलणार असून ग्रामस्थांची आर्थिक प्रगतीही होणार आहे. त्या वनपट्ट्यांचे लवकरच वितरण करण्यात येणार आहे.

वनहक्क कायदा २००६ अनुसूचित जमाती आणि इतर पारंपरिक वनवासींना वनजमिनी आणि संसाधनांवर अधिकार देण्यासाठी तयार केला होता. सन २००५ पूर्वी वनजमिनीवर अतिक्रमण करणाऱ्या अतिक्रमणधारकांना नियम आणि शर्तीच्या आधारे वनजमिनीचे पट्टे दिले जातात.

ही प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी प्रत्येक गावांत वनहक्क कायदा समिती स्थापन करण्यात आली. जिल्ह्यातील सर्व गावांत

समिती स्थापन करण्यात आली. या कायद्याचा वापर करून ५४५ ग्रामपंचायतींमध्ये समित्या स्थापन करण्यात आल्या. वनहक्क समित्यांनी सामूहिक वापरासाठी वनजमिनीची मागणी करणारे प्रस्ताव सादर केले होते. हक्क मिळताच त्याचा वापर करणे, हा त्याचा मुख्य उद्देश आहे. आर्थिक संसाधने वाढविण्यासाठी, ही जमीन सामूहिक वनजमिनीचा भाडेपट्टा मिळिवण्यासाठी वापरायची आहे. गोंदिया जिल्ह्यातील सालेकसा आणि गोरेगाव तालुक्यातील १०१ गावातील सामूहिक वनजमिनीच्या प्रस्तावांतर्गत हक्क समितीमार्फत सामूहिक वनजमिनीचे सर्वेक्षण करून सादर करण्यात आले.



प्रशासनाने गोरेगाव आणि सालेकसा तालुक्यातील त्यांच्या कुटुंबीयांना वनजमिनी दिल्या आहेत. त्यामुळे त्यांना मोठा दिलासा मिळाला असून आर्थिक संकट दूर होण्यास मदत होणार आहे.

# प्राथमिक शिक्षकांना केंद्रप्रमुख पदापासून डावलले

**गोंदिया :–** महाराष्ट्र शासनाच्या ग्राम विकास विभागाच्या १८ जुलै २०२५ च्या अधिसूचनेमुळे जिल्हा परिषद शाळांतील अनेक ज्येष्ठ शिक्षक पदोन्नतीपासून वंचित राहणार आहेत. केंद्रप्रमुख या नव्याने तयार केलेल्या पदासाठी प्रशिक्षित पदवीधर शिक्षक प्राथमिक या पदावर किमान सहा वर्ष कार्यरत असणे अनिवार्य केले आहे. मात्र बहुसंख्य बीएड आणि दीर्घ सेवा अनुभव असलेले प्राथमिक शिक्षक केवळ मपदनामफ नसल्याने अपात्र ठरत आहेत. त्यामुळे हा निर्णय रद्द करण्याची मागणी विविध शिक्षक संघटनाकडून केली जात आहे.

राज्यातील अनेक जि.प. शाळांमध्ये गेल्या २० वर्षापासून बीएडधारक शिक्षक कार्यरत आहेत. मात्र त्यांची नोंद प्राथमिक शिक्षक अशी असल्याने आणि टीजीटी प्रशिक्षित पदवीधर शिक्षक म्हणून बदल झालेला नाही. म्हणून त्यांना केंद्रप्रमुख पदासाठी विचारले जात नाही. नवीन अधिसूचनेत प्रत्यक्षात सेवाज्येष्ठता, गुणवत्ता, अनुभव गौण ठरवून फक्त पदनामाची तांत्रिक अट लादली जात असल्याचा आरोप शिक्षक संघटनांनी केला आहे.

### अधिसूचनेतील मूळ अट

**केंद्रप्रमुख पदासाठी प्रशिक्षित पदवीधर शिक्षक (प्राथमिक) या पदावर सहा वर्षे कार्यरत असलेल्यांना पात्रता आहे. यामुळे दीर्घ सेवा व आवश्यक शैक्षणिक अर्हता असूनही केवळ पदनाम नसल्याने हजारो शिक्षकांचा न्याय्य हक्कापासून डावलले जात असल्याने शिक्षकांत असंतोष आहे.**

### सेवाज्येष्ठ शिक्षकांना संधी देण्याची मागणी

**शिक्षकांच्या अनुभवाचा, गुणवत्ता आणि सेवा वर्षांचा योग्य सन्मान न करता फक्त पदनामावर केंद्रप्रमुखपदासाठी निवड होणं अन्यायकारक आहे. त्यामुळे शासनाने अधिसूचनेतील अटी शिथिल करून सर्व पात्र, सेवाज्येष्ठ शिक्षकांना न्याय्य संधी देण्यात यावी.**

## नवीन तयार करायला किती वर्षे लागणार?



**गोंदिया :–** शहरातील गोंदिया–बालाघाट मार्गावरील जुना उड्डाणपूल जीर्ण झाल्याने तो उड्डाणपूल पाडून त्या ठिकाणी नवीन पूल मंजूर करण्यात आला. जुना उड्डाणपूल पाडून नवीन पुलाचे बांधकाम सुरू होण्यास तब्बल तीन वर्षे लागली. त्यामुळे आता नवीन उड्डाणपुलाचे बांधकाम केव्हा पूर्ण होणार आणि शहरवासीयांचा त्रास केव्हा दूर होणार, असा सवाल उपस्थित केला जात आहे.एकाच कंत्राटदाराला गोंदिया–बालाघाट मार्गावरील उड्डाणपूल तसेच म रारटोली आरओबीचे काम देण्यात आले आहे. त्यामुळे तिन्ही कामे एकाच वेळी करताना कोणतेही एक पूर्ण होत नसल्याचे चित्र आहे.

शहराच्या दोन्ही भागाला जोडणाऱ्या गोंदिया–बाला–घाट मार्गावरील उड्डाणपूल जीर्ण झाल्याने या पुलावरून वाहतूक सुरू ठेवणे धोकादायक झाले होते. त्यामुळे जिल्हा प्रशासन आणि रेल्वे विभागाने याची दखल घेत २०२१ मध्ये या पुलावरील वाहतूक बंद केली. त्यानंतर सन २०२३ मध्ये हा उड्डाणपूल पाडण्यात आला, तर जुलै २०२४ मध्ये नवीन उड्डाणपुलाच्या बांधकामाला सुरुवात करण्यात आली. या पुलाच्या बांधकामासाठी ५७ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. तसेच या पुलाचे बांधकाम ऑगस्ट २०२६ पर्यंत पूर्ण करायचे आहे. पण, गेल्या वर्षभरापासून या उड्डाणपुलाचे बांधकाम अत्यंत संथ गतीने सुरू असून, आतापर्यंत केवळ ४० टक्केच काम झाले आहे.

शहरातील गोंदिया–बाला–घाट मार्गावरील उड्डाणपुलाचे बांधकाम गेल्या दीड वर्षापासून सुरू आहे. परिणामी रेलटोली, कुडवा, रामनगर, मरारटोली, राणी अवंतीबाई चौकाकडे जाण्यासाठी गोरेलाल चौक, नेहरू चौक, कचरा मोहल्ला परिसरातील नागरिकांना अंडरग्राऊंड पुलाच्या मार्गे जावे लागत आहे. पण, पावसाळ्यात या पुलाखाली गुडघाभर पाणी साचत असल्याने हा मार्ग बंद होतो, तर बरेचदा या ठिकाणी वाहतूक कोंडी होते. हा पूल बंद असल्याने शहरवासीयांना तीन ते चार कि. मी.चा फेरा मारून जावे लागते.

## शासकीय वसतिगृह व समाज भवनाकरिता जमीन उपलब्ध करा

### आदिवासी पीपल फेडरेशन:आदिवासी कल्याण समितीला दिले निवेदन



**गोंदिया :–** जिल्ह्याच्या ठिकाणी आदिवासी मुलामुलींकरिता शासकीय वसतिगृह तसेच आदिवासी समाजाकरिता समाज भवनाकरिता जमीन उपलब्ध करून द्यावी यासह अन्य – मागण्यांसाठी आदिवासी पीपल फेडरेशनच्यावतीने जिल्ह्याच्या दौऱ्यावर असलेल्या आदिवासी कल्याण समितीला निवेदन देण्यात आले.

आदिवासी कल्याण समिती जिल्ह्यातील आदिवासींच्या विविध समस्या जाणून घेण्याकरिता दौऱ्यावर आली आहे. अशात ऑल इंडिया आदिवासी पीपल फेडरेशनच्या नेतृत्वात आदिवासी समाजातील विविध संघटनांच्या समूहाने आदिवासी कल्याण समिती प्रमुख आमदार दौलत दरोडा यांची भेट घेतली. तसेच त्यांना येथील आदिवासी समाजाच्या विविध समस्यांशी अवगत करण्यात आले. तसेच जिल्हा आदिवासीबहुल असून जिल्ह्याच्या ठिकाणी आदिवासी मुलामुलींकरिता शासकीय वसतिगृह तसेच आदिवासी समाज भवनाकरिता जमीन उपलब्ध करून देणे, ११,५०० बोगस आदिवासींना अधिसंख्या पदावरून निष्कासित करून त्वरित स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून स्वतंत्र आदिवासी सम ाजातून भरण्यात यावे यासह अन्य मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

निवेदन देताना आदिवासी पीपल फेडरेशन जिल्हाध्यक्ष करण टेकाम, महिला फेडरेशन संगीता पुसाम, गोंडवाना मित्र मंडळ अध्यक्ष घनश्याम तोडसाम, विद्यार्थी संघटेनेचे निळकंठ चिचाम, माजी नगरसेविका प्रमिला सिन्द्राम, ललिता ताराम, राधिका सलामे, सरिता धनबाते, माजी नगरसेवक विनोद पंधरे, दिलेश्वर मडावी व समाजबांधव उपस्थित होते.

# रक्षाबंधनाला ५० आंतरजातीय जोडप्यांचा होणार सत्कार

**नवेगावबांध:–** नेहमीच गावात नाविन्यपूर्ण उपक्रम राबविणाऱ्या येथील सार्वजनिक गाव उत्सव समितीच्यावतीने रक्षाबंधनाला आंतरजातीय विवाह केलेल्या जोडप्यांचा सत्कार केला जाणार आहे. यात उभयतांच्या सत्कारासोबतच, लाडक्या बहिणीला रक्षाबंधनाची भेट म्हणून साडीचोळी भेट देण्यात येणार आहे. या आगळ्यावेगळ्या, नाविन्यपूर्ण कार्यक्रमात गावातील ५० आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्यांचा सत्कार करण्यात येणार आहे.

सदर उपक्रमातून समाजात समता निर्माण व्हावी. सामाजिक भेदभावाच्या सर्व भिंती गळून पडाव्यात व समतेवर आधारलेल्या समाजाच्या निर्मितीसाठी केलेला लहानसा प्रयत्न आहे असल्याची माहिती समितीने एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे. त्याबरोबरच १० ऑगस्टला रक्षाबंधन सणाचे औचित्य साधून रात्री ८ वाजता येथील ग्रामपंचायतसमोरील पशुवैद्यकीय दवाखान्याच्या पटांगणावर लाडक्या बहिणींसाठी, त्यांच्या मनोरंजनासाठी सुपरफास्ट डान्सिंग क्वीन, लावणी सम्राज्ञी मयुरी मुंबईकर यांच्या ग्रुपचा पारिवारिक व मराठमोळ्या लावण्यांचा बहारदार कार्यक्रम आयोजित केला आहे.

### सहकार्य करण्याचे आवाहन

**नवेगावबांध येथील सार्वजनिक गाव उत्सव समितीच्यावतीने यापुढेही सामाजिक व समाज प्रबोधनात्मक कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती समितीचे प्रवीण डोये यांनी दिली. आंतरजातीय विवाह केलेल्या जोडप्यांनी समितीकडे नोंदणी करावी. तसेच कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गावकऱ्यांनी सहकार्य करण्याचे आवाहन समितीचे अध्यक्ष तुकाराम मेश्राम, उपाध्यक्ष संजय भुमके, सचिव प्रवीण डोये, मिलिंद बडोले, गौरव चौधरी, अशोक भुमके, दिलीप पोवळे, अशोक परशुरामकर, सचिन सांगोळकर यांनी केले.**



यापूर्वी सार्वजनिक गाव उत्सव समितीच्यावतीने, लाडक्या गाव जावयांचा सत्कार, दिव्यांग स्त्री व पुरुषांचा सत्कार, ११० वर्षांचे वयोवृद्ध जयराम हांडेकर यांच्यासह ६० वर्षांवरील गावातील ज्येष्ठ स्त्री आणि पुरुष नागरिकांचा सत्कार, गावातील विधवा स्त्रियांचा सत्कार करण्याचा उपक्रम राबविण्यात आला आहे. समाजात व त्यांच्या घरी कुटुंबीयांकडून त्यांचा सन्मान व्हावा व आदराची वागणूक मि ळावी, यासाठी समिती प्रयत्नशील आहे. रक्षाबंधनाच्या रात्री ८ वाजता होणाऱ्या मराठमोळ्या लावण्यांच्या बहारदार कार्यक्रमासाठी मुंबईवरून येणाऱ्या मयुरी मुंबईकर आणि कलाकारांची रॅली येथील इंदिरानगर ते बसस्थानकापर्यंत मुख्य रस्त्यावरून काढण्यात येणार आहे.